१०) भविष्यात रस्ते रुंदीकरण वा अन्य विकासकामांमुळे पुतळे हलविण्याचा प्रसंग आल्यास त्यास पुतळा उभारणाऱ्या संस्थेचा विरोध राहणार नाही व संबंधित संस्था पुतळा हलविण्या बाबत सर्व खर्च व कार्यवाही करेल असे शपथ करुन द्यावे.

११) पुतळयाची देखभाल मांगल्य व पावित्र्य राखण्याची जबाबदारी पुतळा उभारणाऱ्या संस्थेवर राहील संस्थे कडून तसे करार पत्र लिहून सादर करणे आवश्यक आहे.

१२) पुतळा उभारणे बाबत संबंधित पुतळा उभारणारी संस्था सर्व दृष्टीकोणातून सक्षम आहे याची खात्री पटवावी.

१३) पुतळया संबंधिचा सर्व खर्च पुतळा ऊभारणारी सस्था करील व शासनाकडे कोणत्याही निधीची मागणी ज रणार नाही असे वचनपत्र संस्थेने करुन द्यावे.

१४) शासनाच्या पुर्वपरवानगी शिवाय एखाद्या व्यक्तीने / संस्थेने/ समितीने पुतळा उभारल्यास अशा व्यक्ती / सस्था / समिती कायदेशीर कार्यवाहीस पात्र राहील. व अशा प्रकरणात जिल्हाधिकारी निहीत करतील त्यानुसार दंडास देखील पात्र राहतील.

१५) जिल्हापरीषदेच्या अखत्यारीतील रस्त्यांवर पथकिनाऱ्यांवरती क्षेत्रात कोणत्याही प्रकारचा पुतळा उभारण्यात येऊ नये (संदर्भ क्र. २ नुसार)

वरील प्रमाणे मार्गदर्शक सुचनांप्रमाणे आपण यथोचित आवश्यक कागदपत्रे नोंदणीकृत समिती/ सस्था यांचे लेटरहेडवर सविस्तर अर्जासोबत जोडून स्वमालकीच्या जागेच्या ऊताऱ्यासह प्रस्ताव ग्रा.पं.कडे ठराव घेणे कामी सादर करावा म्हणजे ग्रा.पं. ग्रामसभेसमोर चर्चेसाठी विषयपत्रिकेवर विषय घेता येईल. ज ळावे. **<u>आपला अर्ज यास्तरावरुन निकाली काढणेत येत आहे.</u>**

प्रत माहीतीसाठी सविनय सादर.

१) मा.जिल्हाधिकारी साहेब ---------------
२) मा.मुख्य कार्यकारी अधिकारी साहेब जिल्हा परीषद, ----------------
३) मा.उपविभागीय अधिकारी सिल्लोड भाग ----------- जि.-----------------
४) मा.तहसिलदार साहेब -------------- जि. --------------
५) मा.गट विकास अधिकारी साहेब ----------- ता. जि--------------
६) मा. पोलीसनिरीक्षक साहेब सोयगाव पोलिस स्टेशन -----------ा जि--------------

# ग्राम पंचायत कार्यालय मोंढाळा

## तालुका पाचोरा जिल्हा जळगाव

दिनांक /०५/२०१७

प्रति,

श्री. रहीम अंकुश तडवी अध्यक्ष तडवी मुस्लिम पंचकमेटी संचलित जोहरा अरबी मदर्सा मोंढाळा ता.पाचोरा जि.जळगाव

विषय :- तडवी मुस्लिम पंचकमेटी संचलित जोहरा अरबी मदर्सा मोंढाळा ता.पाचोरा यास बांधकाम परवानगी देणे बाबत.

संदर्भ :- १) आपला दिनांक १४/०३/२०१७ चा विषयांकित अर्ज (प्राप्त दिनांक २०/०३/२०१७)
२) महाराष्ट्र ग्राम पंचायत अधिनीयम १९५८ चे कलम ५२ (२)

उपरोक्त संदर्भीय विषयान्वये कळविणेत येते कि, महाराष्ट्र ग्राम पंचायत अधिनीयम १९५८ चे कलम ५२(२ ) नुसार गावठाण क्षेत्रात, विहीत रितीने अर्ज व कागदपत्रांची पुर्तता केल्यास व राज्य शासनाने पदस्थापित केलेल्या नगररचना अधिकाऱ्याची पुर्वपरवानगी घेतल्या नंतरच महाराष्ट्र ग्राम पंचायत अधिनीयम १९५८ चे कलम ५२(१-अ) नुसार ग्राम पंचायतीला बांधकाम परवानगी देणेचा अधिकार आहे.

आपल्या अर्जाचे व जोडलेल्या कागदपत्रांचे अवलोकन केले असता आपण बांधकाम करणेचा नकाशा बल्युप्रींट जोडलेली नाही तसेच आपण आपली जागेची निर्वीवाद मालकी असले बाबतचा ७/१२ ऊतारा सोबत जोडलेला नाही तसेच बांधकामाचे अंदाजपत्रक सोबत जोडलेले नाही तसेच आपण करीत असलेले बांधज़ाम हे धार्मिज़ कार्यासाठीचे बांधकाम असल्याने आपण प्रकरणी सक्षम अधिकारी यांची परवानगी जोडावी, तरी सदर कागदपत्रांची पुर्तता करुन बांधकाम परवानगी मिळणे बाबतचा परीपुर्ण प्रस्ताव सादर करावा म्हणजे मंजूरी साठी नज़र रचना अधिकारी यांचे कडे सादर करता येईल.

आपला अर्ज या स्तरावरुन निकाली काढणेत येत आहे. कळावे

सोबत - आपला मुळ अर्जासह प्रकरण जोडले आहे.

प्रत - म.तहसिलदार पाचोरा जि.जळगाव माहीती साठी सविनय सादर
प्रत - म. गट विकास अधिकारी (उच्च श्रेणी) पंचायत समिती,पाचोरा माहीती साठी सविनय सादर.
प्रत - सहाय्यक पोलिस निरीक्षक पिंपळगाव (हरे.) पोलिस स्टेशन ता.पाचोरा जि.जळगाव

# ग्राम पंचायत कार्यालय ---------

## तालुका ------------ जिल्हा जळगाव

दिनांक :-     /     /२०१

*रजिष्टर पोष्टाने / हस्तबटवडयाने*

**प्रति,**

श्री/श्रीमती ----------------------------------------------------------------------------

**विषय :-** माहीतीचा अधिकार अधिनीयम २००५ अंतर्गत माहीती बाबत.

**संदर्भ- १)** माहीतीचा अधिकार अर्ज दिनांक     /     /२०१     (प्राप्त दिनांक     /     /२०१     )
२) माहीतीचा अधिकार अधिनीयम २००५ कलम ६(१)

**महोदय,**

उपरोक्त संदर्भीय विषयान्वये आपणास कळविणेत येते की, आपण माहीती मिळण्याचा अर्ज करतांना माहीतीचा अधिकार अधिनीयम २००५ कलम ६(१) अन्वये अर्जावर १०/- रुपये किंमतीचा कोर्ट फी स्टँप न लावल्यानमुळे आपला अर्ज खारीज करणेत येत आहे.

नियमानुसार योग्य त्या किंमतीचा कोर्ट फी स्टँप चिटकवून अर्ज करावा. आपला अर्ज या स्तरावरुन निकाली काढणेत येत आहे.

अपीला साठी प्रथम अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी पंचायत समिती, ------------- यांचे कडे संपर्ज साधावा.

जनमाहीती अधिकारी
तथा
ग्राम सेवज
ग्राम पंचायत ----------
ता.-----------जि.जळगाव

प्रत :- म. गट विकास अधिकारी पंचायत समिती, --------------- माहीती साठी सविनय सादर.

जनमाहीती अधिकारी
तथा
ग्राम सेवज
ग्राम पंचायत ----------
ता.-----------जि.जळगाव

# ग्राम पंचायत कार्यालय -----------

## तालुका --------- जिल्हा जळगाव

दिनांक :- / /२०१

*रजिष्टर पोष्टाने /हस्तबटवडयाने*

प्रति,
श्री. /श्रीमती -----------------------------------------------------------------------------------------

**विषय** :- माहीती अधिकार २००५ अन्वये आपल्या दिनांक / /२०१ (प्राप्त दि. / /२०१ ) चे अर्जानुसार माहीचे अवलोकन करणे कामी ग्रा.पं. ----------- येथे दिनांक / /२०१ रोजी ठिक १०.०० वाजता हजर राहणे बाबत

संदर्भ :- १) आपला दिनांक / /२०१ (प्राप्त दि. / /२०१ ) चा अर्ज.
२) माहीतीचा अधिकार २००५ मधील नियम ३(ख) व नियम ४(ब) .

उपरोक्त संदर्भीय विषयान्वये कळविणेत येते कि, आपला वरील संदर्भ क्र.१ चा अर्ज दिनांक / /२०१ रोजी या कार्यालयास प्राप्त झालेले असून, सदर अर्जात नमूद माहीती ही अत्यंत व्यापक स्वरुपाची असल्याने तसेच सदर माहीती पुरवणे कामी व्यापक स्वरुपाची यंत्रणा वळवावी लागणार असल्याने सदर अर्जात नमूद माहीती पैकी साधनस्वरुपात उपलब्ध असलेल्या माहीतीचे अवलोकन करणे कामी आपण दि. / /२०१ रोजी सकाळी ठिक १०.०० वाजता फक्त वही व पेन्सिल घेऊन स्वत: हजर रहावे.

माहीतीचे अवलोकन केल्यानंतर आपणास पाहीजे असलेली वाजवी खर्चात (रु.१००/- पर्यंत) छायांकित करुन मिळेल अशी माहीती आपणास आपण दारीद्रय रेषेखालील असल्याने मोफत पुरवणेत येईल.

अपिलासाठी प्रथम अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी पंचायत समिती, ----------- यांचे कडे संपर्क साधावा.

जनमाहीती अधिकारी
तथा
ग्राम सेवक
ग्राम पंचायत ----------
ता.-----------जि.जळगाव

प्रत :- म. गट विकास अधिकारी पंचायत समिती, --------------- माहीती साठी सविनय सादर.

जनमाहीती अधिकारी
तथा
ग्राम सेवक
ग्राम पंचायत ----------
ता.-----------जि.जळगाव

# ग्राम पंचायत कार्यालय -----

## तालुका --------- जिल्हा जळगाव

दिनांक :- / /२०१

***<u>रजिष्टर पोष्टाने /हस्तबटवडयाने</u>***

प्रति,

श्री/ श्रीमती ---------------------------------------------------------------------------

विषय :- विषय :- माहीती अधिकार २००५ अन्वये माहीती बाबत.

संदर्भ :- १) आपला दिनांक / /२०१ चा माहीती अधिकार २००५ अंतर्गत चा अर्ज
(प्राप्त दिनांक / /२०१ )
३) महाराष्ट्र शासन परीपत्रक क्र.केंमा.अ.-२००८/प्र.क्र.९३/२००८/सहा(मा.अ.)सामन्य प्रशासन विभाग मंत्रालय मुंबई ४०००३२ दिनांक ०६ सप्टेंबर २००८

**महोदय,**

उपरोक्त संदर्भीय विषयान्वये आपणास कळविणेत येते कि, आपला वरील संदर्भ क्र.१ चा अर्ज या कार्यालयास दिनांक / /२०१ रोजी प्राप्त झालेला असून आपण मागणी केलेली **<u>माहीती ही जशीच्यातशी दस्तस्वरुपात या कार्यालयात उपलब्ध नाही</u>** करीता माहीती पुरवता येत नाही

**<u>महाराष्ट्र शासन परीपत्रक क्र.केंमा.अ.-२००८/ प्र.क्र. ९३/ २००८ /सहा (मा.अ.) सामन्य प्रशास-ा विभाज मंत्रालय मुंबई ४०००३२ दिनांक ०६ सप्टेंबर २००८.नुसार उपलब्ध माहीती देणेच अभिप्रेत असलेने, माहीती पुरवता येत नाही. कळावे. आपला अर्ज यास्तरावरुन निकाली काढणेत येत आहे</u>**

अपिलासाठी प्रथम अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी पंचायत समिती, ----------- यांचे कडे संपर्क साधावा.

जनमाहीती अधिकारी
तथा
ज्राम सेवज
ग्राम पंचायत ----------
ता.-----------जि.जळगाव

प्रत :- म. गट विकास अधिकारी पंचायत समिती, --------------- माहीती साठी सविनय सादर.

जनमाहीती अधिकारी
तथा
ज्राम सेवज
ग्राम पंचायत ----------
ता.-----------जि.जळगाव

# ग्राम पंचायत कार्यालय वडगाव नालबंदी

## तालुका भडगाव , जिल्हा जळगाव

दि-tांज १९ /१२/२०१६

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी (उच्च श्रेणी) पंचायत समिती,भडगाव यांचे समोरील कामकाज**

श्री.चव्हाण पंढरीनाथ गणपत
मु.पो.वडगाव नालबंदी
ता.भडगाव जि.जळगाव } **अपिलकार**

**विरुध्द**

जन माहीती अधिकारी तथा
ग्रामसेवक ग्रा.पं.वडगाव नालबंदी
पंचायत समिती,भडगाव } **प्रतिवादी**

मी दिपक निंबा पाटील जन माहीती अधिकारी तथा ग्रामसेवक ग्राम पंचायत भडगाव प्रत्यक्ष हजर होऊन आपले कडील जा.क्र.पंसभ/प्रअ.अधि/आरआर/४६८/२०१६ दिनांक ०८/१२/२०१६ (प्राप्त दि.१६/१२/१६) अपिल सुनावणी बाबतचे पत्राचे अवलोकन करुन अपिलकाराचे अपिल कोणत्या अर्जाबाबत आहे हे ऊक्त पत्रात नमूद नसलेने व या कार्यालयात अपिलकार यांचे या पुर्वी दोन अर्ज प्राप्त झालेले होते, व त्याच दोन अर्जांचे बाबतीत सदरचे अपिल आहे असे गृहीत धरुन केलेल्या कार्यवाहीचे तसेच **बचावाचे अभिवेदन** सादर करतो तो खालील प्रमाणे.

(१) अपिलकार यांनी दिनांक ०१/१०/२०१६ (प्राप्त दि.०५/१०/२०१६) रोजी माहीती अधिकार २००५ अन्वये या कार्यालयात अर्ज सादर केला असता अपिलकाराचे अर्जास सकारात्मक प्रतिसाद देत मी जन माहीती अधिकारी या नात्याने अर्जदार यांनी मोघम स्वरुपाची माहीती मागीतली असल्याने व सदर माहीती जशीच्या तशी दस्त स्वरुपात या कार्यालयात अपलब्ध नसलेने पुरवता येत नाही म्हणुन इकडील दिनांक २४/१०/२०१६ चे पत्रान्वये अर्ज निकाली काढणेत आला आहे व सदर पत्राची एक प्रत आपणाकडेस माहीतीसाठी सादर करणेत आलेली आहे करीता महोदय, मी माहीती अधिकार कायदा २००५ नुसार कायदेशिर कार्यकाही केलेली आहे तरी अपिलकार यांचे अपिल खारीज करावे ही नम्र विनंती.

(२) अपिलकार यांनी दिनांक १६/१०/२०१६ (प्राप्त दि.२०/१०/२०१६) रोजी माहीती अधिकार २००५ अन्वये या कार्यालयात अर्ज सादर केला असता अपिलकाराचे अर्जास सकारात्मक प्रतिसाद देत मी जन माहीती अधिकारी या नात्याने अर्जदार यांनी मोघम स्वरुपाची माहीती मागीतली असल्याने व सदर माहीती जशीच्या तशी दस्त स्वरुपात या कार्यालयात अपलब्ध नसलेने पुरवता येत नाही म्हणुन इकडील दिनांक / /२०१६ चे पत्रान्वये अर्ज निकाली काढणेत आला आहे व सदर पत्राची एक प्रत आपणाकडेस माहीतीसाठी सादर करणेत आलेली आहे करीता महोदय, मी माहीती अधिकार कायदा २००५ नुसार व शासन निर्देशानुसार कायदेशिर कार्यकाही केलेली आहे तरी अपिलकार यांचे अपिल खारीज करावे ही नम्र विनंती.

**जन माहीती अधिकारी**
**तथा**

# ग्राम पंचायत कार्यालय खेडगाव खुर्द

## तालुका भडगाव , जिल्हा जळगाव

दि-गांज १९ /१२/२०१६

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी (उच्च श्रेणी) पंचायत समिती,भडगाव यांचे समोरील कामकाज**

| | | |
|---|---|---|
| श्री.वसंत काशिनाथ शिनकर<br>मु.पो.खेडगाव खुर्द<br>ता.भडगाव जि.जळगाव | } | **अपिलकार** |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| जन माहीती अधिकारी तथा<br>ग्रामसेवक ग्रा.पं.खेडगाव खुर्द<br>पंचायत समिती,भडगाव | } | **प्रतिवादी** |

मी भिला काशिनाथ बोरसे जन माहीती अधिकारी तथा ग्रामसेवक ग्राम पंचायत खेडगाव खुर्द भडगाव प्रत्यक्ष हजर होऊन आपले कडील जा.क्र.पंसभ/प्रअ.अधि/आरआर/४६९/२०१६ दिनांक ०८/१२/२०१६ (प्राप्त दि.१४/१२/१६) अपिल सुनावणी बाबतचे पत्रानुसार केलेल्या कार्यवाहीचे तसेच **बचावाचे अभिवेदन** सादर करतो तो खालील प्रमाणे.

अपिलकार यांनी दिनांक ११/०८/२०१६ (प्राप्त दि.१६/०८/२०१६) रोजी माहीती अधिकार २००५ अन्वये या कार्यालयात अर्ज सादर केला असता अपिलकाराचे अर्जास सकारात्मक प्रतिसाद देत मी जन माहीती अधिकारी या नात्याने अर्जदार यांना माहीतीचे फी बाबत दिनांक ०१/०९/२०१६ रोजी रजिष्टर पोष्टाने तपशिलवार कळवून फी भरणा करणे बाबत कळविले असता अपिलकार यांनी ग्रा.पं.कडे रोखीने दिनांक १४/०९/२०१६ रोजी रक्कम रु.४२/- मात्र चा भरणा केला व सदर रक्कम ग्रा.पं.ने दिनांक १४/०९/२०१६ रोजी बँक ऑफ बडोदा शाखा भडगाव येथे शासनाने दिलेल्या लेखा शिर्षाखाली चलनाद्वारे भरणा करणेत आलेली आहे.

(१) **<u>ज्र मांज महाराष्ट्र शासन संजीर्ज २०१२/७०८/प्रज्र/३५३/६ सामा-य प्रशास-ा विभाज, १९ वा मजला नविन प्रशासन भवन मादाम कामारोड हुतात्मा राजगुरु चौक मंत्रालया समोर मुंबई ४०००३२ दिनांक २२ ऑगष्ट २०१२</u>** चे पत्रातील मार्गदर्शक सुचनांप्रमाणे माहीती अधिकार अर्जाची फी रकमेचा भरणा कोषागारात झाल्यानंतर माहीती पुरवणे कामी सदरचा निधी काढता येत नाही म्हणून ग्राम पंचायतीकडे माहीती पुरवणे कामी निधी नसतो करीता प्राधिकरणाकडून माहीती पुरवणे कामी अनुदान उपलब्ध करुन द्यावे अशा आशयाचे पत्रा आपणास सदर पत्राची प्रत प्रथम अपिलीय अधिकारी या नात्याने दिलेले आहे. परंतू आद्याप निधी प्राप्त न झालेने अपिलकार यांना माहीती पुरवता येत नाही. सबब आपणा मार्फत प्राधिकरणाकडून अनुदान उपलब्ध झाल्यावर अपिलकार यांना सत्वर माहीती पुरवणेत येईल. तरी महोदय, मी माहीती अधिकार कायदा २००५ नुसार व शासन निर्देशानुसार कायदेशिर कार्यवाही केलेली आहे तरी महोदय,**अपिलकार यांचे अपिल खारीज करावे** ही नम्र विनंती.

सोबत सहपत्र ०१ ते जोडले आहे.

**जन माहीती अधिकारी**
**तथा**

# ग्राम पंचायत कार्यालय लोज प्र.भ.

## तालुका भडगाव , जिल्हा जळगाव

दि-तांज १९/१२/२०१

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी (उच्च श्रेणी) पंचायत समिती,भडगाव यांचे समोरील कामकाज**

श्री.विनोद कैलास पाटील
मु.पो.लोण पिराचे
ता.भडगाव जि.जळगाव
} **अपिलकार**

**विरुध्द**

१) जन माहीती अधिकारी तथा
ग्रामसेवक ग्रा.पं.लोण प्र.भ.
पंचायत समिती,भडगाव
२) जन माहीती अधिकारी तथा
शाखा अभियंता
बांधकाम विभाग,भडगाव
} **प्रतिवादी**

मी संजय छबुलाल चौधरी जन माहीती अधिकारी तथा ग्रामसेवक ग्राम पंचायत लोण प्र.भ.ता. भडगाव प्रत्यक्ष हजर होऊन आपले कडील जा.क्र.पंसभ/प्रअ.अधि/आरआर/४७०/२०१६ दिनांक ०८/१२/२०१६ (प्राप्त दि.१५/१२/१६) अपिल सुनावणी बाबतचे पत्रानुसार केलेल्या कार्यवाहीचे तसेच **बचावाचे अभिवेदन** सादर करतो तो खालील प्रमाणे.

मी संजय छबुलाल चौधरी जन माहीती अधिकारी तथा ग्राम सेवज ग्राम पंचायत लोण प्र.भ. ता.भडगाव जि.जळगाव समक्ष पंचायत समिती भडगाव येथे हजर राहून बचावाचे अभिवेदन सादर करतो कि, **आपले कडील पत्रात नमूद असलेल्या अर्जदाराचा माहीती अधिकार २००५ अंतर्गत माहीती मागणी चा अर्ज या कार्यालयास प्राप्त झालेला -ाही.**

तसेच सदर प्रथम अपिलावर सुनावणी दिनांक १९/१२/२०१६ रोजी दुपारी ठिक ०२.३० वाजता असले बाबत नमूद आहे. व सदर अपीला बाबतचे पत्र मला दिनांक १५.१२.२०१६ रोजी प्राप्त झालेले आहे व सुनावणी दिनांक १९.१२.२०१६ रोजी आहे, प्रस्तुत प्रकरणी अर्ज या कार्यालयास प्राप्त नसल्याने नियमानुसार कार्यवाही करता येत नाही ज ळावे.

(संजय छबुलाल चौधरी)
जनमाहीती अधिकारी
तथा

प्रत :- मे.राज्य माहीती आयोग खंडपिठ नाशिक, पिनॅकल मॉल, चौथा मजला त्र्यंबकनाका, सिग्नल जवळ, नाशिक माहीती साठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी सविनय सादर.

(संजय छबुलाल चौधरी)
जनमाहीती अधिकारी
तथा

# ग्राम पंचायत कार्यालय माहीजी

## तालुका पाचोरा , जिल्हा जळगाव

दिनांक २२/१२/२०१

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी (उच्च श्रेणी) पंचायत समिती, पाचोरा यांचे समोरील कामकाज**

| | |
|---|---|
| श्री.घनशाम भास्कर बडगुजर<br>मु.पो.माहीजी<br>ता.पाचोरा जि.जळगाव | **अपिलकार** |

**विरुध्द**

| | |
|---|---|
| १) जन माहीती अधिकारी तथा<br>ग्रामसेवक माहीजी<br>ता.पाचोरा जि.जळगाव | **जबाबदार** |

मी नंदकुमार गोकुळ पाटील विद्यमान जन माहीती अधिकारी तथा ग्रामसेवक ग्राम पंचायत माहीजी ता.पाचोरा प्रत्यक्ष हजर होऊन आपले कडील जा.क्र.पसपा/आ-२/आरआर/२२९/२०१६ दिनांक १३/१२/२०१६ (प्राप्त दि. /१२/१६) अपिल सुनावणी बाबतचे पत्रानुसार केलेल्या कार्यवाहीचे तसेच **बचावाचे अभिवेदन** सादर करतो तो खालील प्रमाणे.

मी नंदकुमार गोकुळ पाटील विद्यमान जन माहीती अधिकारी तथा ग्रामसेवक ग्राम पंचायत माहीजी ता.पाचोरा जि.जळगाव समक्ष पंचायत समिती पाचोरा येथे हजर राहून बचावाचे अभिवेदन सादर करतो कि, **अपिलकार** यांचा माहीती अधिकार २००५ अंतर्गत माहीती मागणे बाबतचा मुळ अर्ज दिनांक २०/०६/२०१६ (प्राप्त दिनांक २१/०६/२०१६) या कार्यालयास प्राप्त झाला असता तत्कालिन जनमाहीती अधिकारी श्री.भुषण चंद्रसिंग सोळंके यांनी अपिलकार यांच्या अर्जास सकारात्मक प्रतिसाद देत दिनांक २७/०९/२०१६ रोजी चे पत्रान्वये अपिलकार यांना कळवून अर्ज निकाली काढलेला आहे व सदर पत्राची प्रत आपणास सादर करुन प्रस्तुत प्रकरणी अवगत केलेले आहे.

अपिलकार यांनी त्यांच्या मुळ अर्जा मागणी केलेली माहीती जशीच्या तशी या कार्यालयाकडे उपलब्ध नसलेने महाराष्ट्र शासन परीपत्रक क्र.केमा.अ.-२००८/प्र.क्र ९३/२००८ सहा(मा.अ.)सामान्य प्रशासन विभाग मंत्रालय मुंबई ४०००३२ दिनांक ०६ सप्टेबर २००८ नुसार उपलब्ध माहीती देणेच अभिप्रेत असलेने **अपिलकार यांचे अपिल खारिज करावे ही विनंती**

सोबत सहपत्र ०१ ते

(नंदकुमार गोकुळ पाटील)
जनमाहीती अधिकारी
तथा

प्रत :- मे.राज्य माहीती आयोग खंडपिठ नाशिक, पिनॅकल मॉल, चौथा मजला त्र्यंबकनाका, सिग्नल जवळ, नाशिक माहीती साठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी सविनय सादर.

(नंदकुमार गोकुळ पाटील)
जनमाहीती अधिकारी
तथा

# ग्राम पंचायत कार्यालय मेहूनबारे

## तालुका चाळीसगाव जिल्हा जळगाव

दिनांक २५/०१/२०१७

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी (उच्च श्रेणी) पंचायत समिती,चाळीसगाव**
**यांचे समोरील कामकाज**

श्री.विजय रमेशराव देशमुख
मु.पो.मेहुनबारे ता.चाळीसगाव
जि.जळगाव
} **अपिलंट**

**विरुध्द**

जन माहीती अधिकारी तथा
ग्रामसेवक ग्रा.पं.मेहूनबारे
पंचायत समिती,चाळीसगाव
} **रिस्पॉंडंट**

मी अनिल माधवराव पगारे जन माहीती अधिकारी तथा ग्राम विकास अधिकारी ग्राम पंचायत मेहूनबारे चाळीसगाव प्रत्यक्ष हजर होऊन आपले कडील जा.क्र.पंसचा/मा.अ./आरआर/१९/२०१७ पंचायत समिती,चाळीसगाव दिनांक १०/०१/२०१७ (प्राप्त दि. /०१/१७) चे अपिल सुनावणी बाबतचे पत्रानुसार केलेल्या कार्यवाहीचे तसेच **बचावाचे अभिवेदन** सादर करतो ते खालील प्रमाणे.

अपिलंट यांनी दिनांक २४/०८/२०१६ रोजी माहीती अधिकार २००५ अन्वये या कार्यालयात अर्ज सादर केला असता अपिलंटचे अर्जास सकारात्मक प्रतिसाद देत मी जन माहीती अधिकारी या नात्याने अपिलंट (अर्जदार) यांना माहीतीचे फी बाबत दिनांक ३०/०८/२०१६ रोजी तपशिलवार कळवून फी भरणा करणे बाबत कळविले असता अपिलंट यांनी दिनांक ०७/१०/२०१६ रोजी रक्कम रु.३१०/- मात्र चा चलनाद्वारे भरणा केला व सदर चलनाची प्रत या कार्यालयास सादर केलेली आहे.

(१) <u>**ज्र मांज महाराष्ट्र शासन संजीर्ज २०१२/७०८/प्रज्र/३५३/६ सामा-य प्रशास-ा विभाज, १९ वा मजला नविन प्रशासन भवन मादाम कामारोड हुतात्मा राजगुरु चौक मंत्रालया समोर मुंबई ४०००३२ दिनांक २२ ऑगष्ट २०१२**</u> चे पत्रातील मार्गदर्शक सुचनांप्रमाणे

माहीती अधिकार अर्जाची फी रकमेचा भरणा कोषागारात झाल्यानंतर माहीती पुरवणे कामी सदरचा निधी काढता येत नाही म्हणून ग्राम पंचायतीकडे माहीती पुरवणे कामी निधी नसतो करीता प्राधिकरणाकडून माहीती पुरवणे कामी अनुदान उपलब्ध करुन द्यावे अशा आशयाचे दिनांक ३०/०८/२०१६ चे पत्र आपल्या हुजूरात प्रथम अपिलीय अधिकारी या नात्याने सादर केलेली आहे व पोहोच दप्तरी ठेवलेली आहे. परंतू आद्याप निधी प्राप्त न झालेने अपिलकार यांना माहीती पुरवता येत नाही. सबब आपणा मार्फत प्राधिकरणाकडून अनुदान (निधी) उपलब्ध झाल्यावर अपिलकार यांना सत्वर माहीती पुरवणेत येईल. तरी महोदय, मी माहीती अधिकार कायदा २००५ नुसार व शासन निर्देशानुसार अपिलंट यांचे अर्जावर कायदेशिर कार्यवाही केलेली आहे.

तरी महोदय आपणास या माझ्या केलेल्या कार्यवाहीच्या तथा बचावाच्या अभिवेदना सोबतच नम्र विनंती.कि -

अ) अपिलंट यांना माहीती पुरवणे कामी निधी उपलब्ध करुन द्यावा

ब) रोजनाम्यात माझे अभिवेदन जशेचेतशे समाविष्ट करावे

क) अपिलंट यांचा अपिल अर्ज खारिज करावा.

सोबत सहपत्र ०१ ते      जोडले आहे.

(अनिल माधवराव पगारे)
जनमाहीती अधिकारी
तथा

प्रत :- मे.राज्य माहीती आयोग खंडपिठ नाशिक, पिनॅकल मॉल, चौथा मजला त्र्यंबकनाका, सिग्नल जवळ, नाशिक माहीती साठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी सविनय सादर.

(अनिल माधवराव पगारे)
जनमाहीती अधिकारी
तथा

महाराष्ट्र ग्राम पंचायत कर व फी (शुल्क) नियम १९६० चे नियम ९८ नुसार घरघुती नळ संयोजन घेणे करीता अर्ज.

शिंदी ता.भडगाव दि.      /      /२०१

प्रति,
म.सरपंच / ग्राम विकास अधिकारी
ग्राम पंचायत शिंदी ता.भडगाव

विषय :- ग्रा.पं.घर क्रमांक      सि.स.क्र.      या जागेवर/ इमारतीत/ मिळकतीत घरघुती नळ संयोजन मिळणे बाबत.

अर्जदार :- श्री.---------------------------------------------------------------

महोदय,

उपरोक्त विषयान्वये विनंती की, मला मला माझ्या मालकीच्या ग्रा.पं.घर क्रमांक      सि.स.क्र.      या जागेवर/ इमारतीत/ मिळकतीत घरघुती नळ संयोजन ची आवश्यकता आहे. मला खालील प्रमाणे ग्राम पंचायतीच्या अटी व शर्ती मान्य राहतील, याची मला पुर्ण जाणिव आहे.

## अटी व शर्ती

१) ज्राम पंचायतीने आकारणी ठरवलेली नापरतावा नळ संयोजन फी रक्कम रुपये      /- अक्षरी रक्कम रुपये ---------------------------------- मला मान्य आहे.

२) ज्राम पंचायतीने ठरवलेली वार्षिक खास पाणी पट्टी रु.      /- अक्षरी रक्कम रुपये ----------------------------------- व वेळोवेळी ग्राम पंचायत पट्टीत वाढ करेल ती मला मान्य राहील, व सदर पट्टी नियमित भरणा करेल, यात कसुर झाल्यास मला पुर्व सुचना न करता ग्राम पंचायतीस नळ संयोजन बंद करील याची मला जाणिव आहे.

३) मी घरघुती नळ संयोजन अर्धा इंच आकाराचे ग्रा.पं.च्या अधिकृत नळ जोडारी यांचे कडूनच घेईल व त्यात कोणत्याही प्रकारचे विनालेखीपरवानगीने फेरफार करणार नाही, व अर्धाइंच पेक्षा मोठया आकाराचे संयोजन घेणार नाही, असे आढळयास मी भा.द.वि. कलम ४३० नुसार फौजदारी स्वरुपाचा गुन्हा दाखल होणेस पात्र राहील याची मला जाणिव आहे.

४) महाराष्ट्र ग्राम पंचायम कर व फी (शुल्क) नियम १९६० च्या तरतूदी मला बंधनकारक राहतील.

-------------------------------------

(नाव --------------------------------)

## ग्राम पंचायत वार्ड मेंमर यांची शिफारस

वरील प्रमाणे अर्जदार यांना आर्धाइंच नळसंयोजन जोडणी करणेस शिफारस आहे.

-------------------------------------

(नाव --------------------------------)

**आदेश:-**

वरील प्रमाणे नळ संयोजन संबंधितास त्यांचे स्वतःचे घरमिळकत असलेने जोडणी करावी.

सरपंच

**महाराष्ट्र ग्राम पं. कर व फी (शुल्क) नियम १९६० चे नियम ९८ (१) नुसार घरघुती नळ संयोजन घेणे करीता अर्ज.**

शिंदी ता.भडगाव दि.    /    /२०१

प्रति,
म.सरपंच / ग्राम विकास अधिकारी
ग्राम पंचायत शिंदी ता.भडगाव

विषय :- ग्रा.पं.घर क्रमांक     सि.स.क्र.     या जागेवर/ इमारतीत/ मिळकतीत घरघुती नळ संयोजन मिळणे बाबत.

अर्जदार :- श्री.---------------------------------------------------------------

सम्मतीदार घरमालकाचे नाव ---------------------------------------------------

महोदय,

उपरोक्त विषयान्वये विनंती की, मला श्री-------------------------------------------- यांच्या मालकीच्या ग्रा.पं.घर क्रमांक     सि.स.क्र.     या जागेवर/ इमारतीत/ मिळकतीत घरघुती नळ संयोजन ची आवश्यकता आहे. मी खालील प्रमाणे मुळ मालकाने सम्मती दिलेली असल्याने मला अर्धाइंची घरघुती नळ संयोजन मिळणेस विनंती आहे. मला खालील प्रमाणे ग्राम पंचायतीच्या अटी व शर्ती मान्य राहतील, याची मला पुर्ण जाणिव आहे.

## अटी व शर्ती

१) ज्ञाम पंचायतीने आकारणी ठरवलेली नापरतावा नळ संयोजन फी रक्कम रुपये    /- अक्षरी रक्कम रुपये ----------------------------------- मला मान्य आहे.

२) ज्ञाम पंचायतीने ठरवलेली वार्षिक खास पाणी पट्टी रु.    /- अक्षरी रक्कम रुपये ----------------------------------- व वेळोवेळी ग्राम पंचायत पट्टीत वाढ करेल ती मला मान्य राहील, व सदर पट्टी नियमित भरणा करेल, यात कसुर झाल्यास मला पुर्व सुचना न करता ग्राम पंचायतीस नळ संयोजन बंद करील याची मला जाणिव आहे.

३) मुळमालकाने अर्ज करुन नळ संयोजन बंद करणेची मागणी केल्यास संयोजन बंद करणेत येईल.

४) मी घरघुती नळ संयोजन अर्धा इंच आकाराचे ग्रा.पं.च्या अधिकृत नळ जोडारी यांचे कडूनच घेईल व त्यात कोणत्याही प्रकारचे विनालेखीपरवानगीने फेरफार करणार नाही, व अर्धाइंच पेक्षा मोठया आकाराचे संयोजन घेणार नाही, असे आढळयास मी भा.द.वि. कलम ४३० नुसार फौजदारी स्वरुपाचा गुन्हा दाखल होणेस पात्र राहील याची मला जाणिव आहे.

५) महाराष्ट्र ग्राम पंचायम कर व फी (शुल्क) नियम १९६० च्या तरतूदी मला बंधनकारक राहतील.

-----------------------------------

(नाव --------------------------------)

## घरमालकाचे सम्मतीपत्र

मी ग्रा.पं.घर क्रमांक     सि.स.क्रमांक     या घराचा मुळमालक / मिळकतीचा ताबा असलेला वारस श्री.------------------------------------------------------- रा. ------------------------------------------- सम्मतीपत्रक लिहून देतो कि, वरील प्रमाणे माझ्या मिळकतीत अर्धाइंची नळसंयोजन देणेस हरकत नाही.

-----------------------------------

(नाव ------------------------------------)

## ग्राम पंचायत वार्ड सदस्य यांची शिफारस

वरील प्रमाणे अर्जदार यांना आर्धाइंच नळसंयोजन जोडणी करणेस शिफारस आहे.

------------------------------------

(-नाव --------------------------------)

**आदेशः-**

वरील प्रमाणे अटी शर्तीचे आधिन राहून आर्धाइंची नळ संयोजन संबंधितास मुळघरमालक / मिळकतीचे वारस यांची सम्मती असलेने नळजोडणी करणेस हरकत नाही.

सरपंच

**<u>मुंबई ग्रा.पं. अधिनीयम १९५८ चे कलम ५२ प्रमाणे परवानगी न घेता घराचे बांधकाम न करणे बाबत</u>**

## ***<u>नोटीस</u>***

**ग्राम पंचायत ------------- ता.-------------**
**-**

**दिनांक :-**

**प्रति,**

**श्री.** ---------------------------------------------- रा.--------- ता.---------- जि.जळगाव

**विषय :-** आपण करीत असलेले बांधकाम त्वरीत थांबवून काढून घेणे बाबत.

**संदर्भ :-** आपण विना परवानगीने सुरु केलेले घराचे बांधकाम

वरील संदर्भीय विषयान्वये आपणास कळवणेत येते की, आपण ग्रा.पं.----------- हद्यीत घर नं.---------- चे जागेवर घराचे बांधकाम करीत असलेचे ग्राम पचांयतीच्या निदर्शनात आले आहे.तरी ही अत्यंत गभिर बाब असून आपण करीत असलेले बांधकाम आपण त्वरीत थांबवून घ्यावे अन्यथा आपणा विरुध्द कायदेशीर कार्यवाही करणेत येईल. व पुढील होंणा-या दुष्परीणामास सर्वस्वी आपणच जबाबदार रहाल याची नोंद घ्यावी.

ग्राम विकास अधिकारी
ग्राम पंचायत -------
ता.----------- जि.---------

सरपंच
ग्रामपंचायत --------
ता.----------- जि.---------

**प्रत :-** म.गट विकास अधिकारी (उच्च श्रेणी) पंचायत समिती, -------------- माहीती साठी सविनय सादर.

**प्रत :-** म.पोलीस निरीक्षक साो ---------- पोलीस स्टेशन माहीती साठी सविनय सादर.

ग्राम विकास अधिकारी
ग्राम पंचायत -------
ता.----------- जि.---------

सरपंच
ग्रामपंचायत --------
ता.----------- जि.---------

# ग्राम पंचायत कार्यालय,---------

## तालुका --------- जिल्हा जळगाव

दि-नांज / /२०१

**<u>महाराष्ट्र ग्राम पंचायत अधिनीयम १९५८ चे कलम ५३/२ प्रमाणे अतिक्रमण काढणे बाबत नोटीस</u>**

प्रति,

श्री. ------------------------------------------ रा. ------------ ता.------------ जि.जळगाव

विषय :- सार्वजनिक उकीर्डे टाकुन, केलेले अतिक्रमण त्वरीत काढून घेणे बाबत.

संदर्भ :- १) श्री ग्रामस्थ राजदेहरे यांचा दिनांक
चा तक्रारी अर्ज.

वरील संदर्भिय विषयान्वये आपणास गंभीरपणे सुचित करणे येते की, आपण सार्वजनिक गावठान जागेवर ऊकीर्डे टाकून अतिक्रमण करीत असले बाबत ग्रा.पं.च्या निदर्शनात आले आहे. करीता आपण नोटीस मिळताच अतिक्रमण थांबवावे व नोटिस मिळाले पासून दहा (१०) दिवसाचे आत अतिक्रमण काढून घ्यावे अन्यथा ग्रामपंचायत मुंबई ग्रा.पं. अधिनीयम १९५८ चे कलम ५३/२ प्रमाणे कार्यवाही करुन अतिक्रमण काढुन घेईल व येणारा खर्च जमिन महसूल म्हणून आपणाकडून वसुल करणेत येईल, तसेच नोटीसीची मुदत संपलेवर नियमाप्रमाणे दंड आकारणी करणेत येईल, करीता आपण त्वरीत सदरचे अतिक्रमण थांबवून काढून घ्यावे, अन्यथा पुढिल होणा-या दुष्परीजामास सर्वस्वी आपणच जबाबदार रहाल याची नोंद घ्यावी.

सरपंच
ग्राम पंचायत ----------
ता. चाळीसगाव जि.जळगाव

प्रत - माहीतीसाठी सविनय सादर

१) म.गट विकास अधिकारी (ऊच्च श्रेणी) पंचायत समिती,--------------
२) म.पोलिस निरीक्षक साहेब ----------------ता.-------------जि.जळगाव

सरपंच
ग्राम पंचायत -----------
ता. चाळीसगाव जि.जळगाव

# गृप ग्राम पंचायत कार्यालय, शिंदी

## तालुका भडगाव, जिल्हा जळगाव

**दिनांक :- २१ /१०/२०१४**

प्रति,
श्री / सौ./ श्रीमती ---------------------------------------------------- रा. शिंदी ता.भडगाव

विषय :- गावी ताप सदृश्य आजाराचे रुग्ण आढळलेने नळाचे खड्डे बुजणे बाबत व नळकनेक्शन आर्धा इंच पेक्षा जास्त आकाराचे असल्यास ते आर्धा इंच करुन घेणे तसेच कनेक्शन पाईपलाईन च्या आडव्या दिशेने अथवा खालच्या दिशेने असल्यास कनेक्शन सरळ करणे बाबत.

उपरोक्त विषयान्वये आपणास गंभिरपणे सुचित करणेत येते की, आपले खाजगी नळ कनेक्शन जवळ मोठा खड्डा केल्याने खड्डयात मोठया प्रमाणावर पाणी साचते व नळ बंद केल्यावर नकारार्थी दाबाने खड्डयातील दुशित पाणी पुन्हा पाईपलाईन मध्ये जाते व पुन्हा नळाला पाणी सोडल्यावर ते दुषित पाणी नळाला येते. ही अत्यंत गंभिर बाब आहे, यामुळे गावात साथीचे रोग पसरण्याची दाट शक्यता नाकारता येत नाही. करीता आपणास या नोटीशीद्वारे गंभिरपणे सुचित करणेत येते कि, आपण नोटीस मिळताच नळाचा खड्डा बुजून घ्यावा.

तसेच आपण खाजगी घरघुती नळ कनेक्शन जोडतांना आर्धा इंच आकाराचे नळ कनेक्शन घेणे आवश्यक होते, परंतू आपण आर्धाइंच पेक्षा जास्त आकाराचे नळ कनेक्शन घेतलेले असल्याचे व घेतलेले नळकनेक्शन पाईपलाईनच्या आडव्या दिशेने / पाईपलाईनच्या खालच्या दिशेने घेतलेचे ग्राम पंचायतीच्या निदर्शनात आले आहे. ही बाब अत्यंत गंभिर असून, यामुळे सार्वजनिक पाणी पुरवठा विस्कळीत होत असून सर्व नळ धारकांना सारख्या प्रमाणात पाणी पुरवठा करणे ग्रा.पं.ला कठीण झाले आहे. हे कृत्य सार्वजनिक पाणी पुरवठयाच्या साधनास क्षती (नुकसान) पोहचवली म्हणून भारतीय दंडसंहीता कलम ४३० प्रमाणे् दखलपात्र गुन्हा आहे.

म्हणून आपण नोटीस मिळताच आपले खाजगी घरघुती नळ कनेक्शन आर्धा इंच आकाराचे करुन घ्यावे अन्यथा आणाकडे बिगर घरघुती कनेक्शन घोषित करुन कमर्शियल आकारणी करणेत येईल. अथवा आपल्या विरुध्द योग्य ती कायदेशिर कार्यवाही करणेत येईल व पुढील होणाऱ्या दुष्परीणामास सर्वस्वी आपणच जबाबदार रहाल याची नोंद घ्यावी.

प्रत :- म. गट विकास अधिकारी पंचायत समिती,भडगाव माहीतीसाठी सविनय सादर.
प्रत :- म.पोलीस निरीक्षक साहेब भडगाव पोलिस स्टेशन भडगाव जि.जळगाव माहीती साठी सविनय सादर.

# गृप ग्राम पंचायत कार्यालय, शिंदी
## तालुका भडगाव, जिल्हा जळगाव

**दिनांक :- ०५/१२/२०१४**

प्रति,

म.जिल्हाधिकारी
जळगाव जि.जळगाव सेवशी

द्वारा - म. गट विकास अधिकारी पंचायत समिती,भडगाव जि.जळगाव

विषय :- मौजे शिंदी ता.भडगाव गावातील गटारीवरील अतिक्रमणे काढणेची परवानगी मिळणे बाबत.

संदर्भ :- १) ग्रा.पं. ठराव क्रमांक दि-नांज २६/११/२०१४
२) जा.क्र.आरोग्य/११/२०१४ प्रा.आ.केंद्र,गुढे ता.भडगाव दिनांक २९/११/२०१४.
३) महाराष्ट्र ग्रा.पं. अधिनीयम १९५८ चे कलम ५३ (२), (२).

आदरणीय महोदय,

उपरोक्त विषयान्वये विनंती पुर्वक प्रस्ताव की, शिंदी ता.भडगाव गावी ग्रामस्थांनी गटारीवर ढापे, ओटे इत्सादी बांधकामे करुन अतिक्रमणे केलेली आहेत. त्यामुळे गावातील गटारींची सफाई योग्य रित्या करता येत नाही व गटारी तळापासून काढून वाहत्या करता येत नाही. व गावी नेहमी साथरोगाची लागण होत असते, त्यामुळे ग्राम पंचायतीला समस्येच्या मुळाशी जाणे व समस्या मुळासकट दुर करणे भाग आहे. करीता

सदरच्या गटारींवर येथील ग्रामस्थांनी अनाधिकाराने ढापे , ओटे व इतर बांधकामे केलेली असलेने व सदरचे अतिक्रमण हे बऱ्याच दिवसापुर्वीचे (सहा महीन्यापुर्वीचे)असलेने अतिक्रमण काढणे बाबतचे अधिकार ग्रा.पं.च्या अखत्यारीत राहीलेले नाही.

महाराष्ट्र ग्राम पंचात अधिनीयम १९५८ चे कलम ५३ (२), (२) अ नुसार सदरचे सहा महीन्यांपुर्वीचे अतिक्रमण काढणेचा अधिकार ग्राम पंचायतीस नसलेने सदरचे अतिक्रमणे काढूणे ची परवानगी मिळावी ही नम्र विंनती.

आपली नम्र.

# गृप ग्राम पंचायत कार्यालय, शिंदी
## तालुका भडगाव, जिल्हा जळगाव

**दिनांक :- ०५/१२/२०१४**

प्रति,
म.गट विकास अधिकारी
पंचायत समिती,भडगाव

विषय :- शिंदी गावातील खाजगी नळ संयोजन सरळ करणे नियमानुकूल करणे व गटारी मोकळया करणे ही कामे करणे कामी कामाचे अंदाजपत्रक तयार करुन तांत्रिक मान्यता मिळणे बाबत.

संदर्भ :- १) जा.क्र.आरोग्य/११/२०१४ प्रा.आ.केंद्र,गुढे ता.भडगाव दिनांक २९/११/२०१४.
२) ग्रा.पं.ने गावात फिरुन शुध्द पाणी पुरवठा करणे बाबत केलेली उपाय योजना.

आदरणीय महोदय,

उपरोक्त संदर्भीय विषयान्वये विनंतीपुर्वक प्रस्ताव की, संदर्भ क्र.१ व २ नुसार शिंदी ता.भडगाव गावाचे सर्वेक्षण केले असता व स्थानिक चौकशी वरुन माहीती काढली असता गावातील बहुतांशी खाजगी नळ संयोजन हे बेकायादेशिररित्या जलवाहीनीच्या आडव्या दिशेने, तसेच खालच्या दिशेने जोडणी करुन घेतलेले आहेत. तसेच शासनाच्या मार्गदर्शक सुचनांप्रमाणे घरघुती खाजगी नळसंयोजन हे अर्धा इंच आकारमानाचे असणे आवश्यक असते, परंतू येथील सर्वच नळ धारकांनी पवना इंची ते एक इंची आकाराचे नळ संयोजनाची जोडणी केलेली असलेने गावातील पाणी पुरवठयावर विपरीत परीणाम होतो, व त्यामुळे जे नळ संयोजन पाण्याच्या टाकीच्या जवळ असतील त्यांना जास्तीच्या पाणी पुरवठा होतो व जे संयोजन दुर अंतरावरील आहेत त्यांना कमी दाबाबने पाणी पुरवठा होतो, याचा परीणाम म्हणून ज्या नळ धारकांना पाणी पुरवठा होत नाही तसेच कमी दाबाने पाणी पुरवठा होतो अशा नळ धारकांनी नळाजवळ मोठे खड्डे खोदून पाणी मिळवण्याचा प्रयत्न केलेला आहे. त्यांचे परीणामस्वरुप नळाच्या खड्डयात साचलेले पाणी नाकारार्थी दाबाने पुन्हा पा.पु.जलवाहीनीत जाते व पुन्हा नळाला पाणी सोडणेचे वेळी हेच दुषीत पाणी नळांना येते, यामुळे गावात साथरोगाची शक्यता नाकारता येत नाही.

यावर कायस्वरुपी उपाययोजना म्हणून गावातील सर्व नळ संयोजन खोदून सरळ करणे व खड्डे बुजणे आवश्यक आहे. तरी सदरचे नळ संयोजन खोदून सरळ करणे कामी व खड्डे बुजणे कामी अंदाजपत्रक तयार करुन तांत्रिक मान्यता मिळणे गरजेचे आहे.

तसेच गावातील बहूतांशी गटारीवर ढापे टाकून, ओटें बांधून अतिक्रमणे केलेली आहेत व त्यामुळे गटारी तळापासून साफसफाई करणे शक्य होत नाही. त्यामुळे गटारी तुंबलेल्या असतात व काही नळ संयोजन गटारी जवळ असलेने तसेच जमिनीलगत असलेने नळांमध्ये गटारीचे पाणी जाऊन दुषीत पाणी पुरवठा होतो, त्यामुळे देखील गावी साथरोगाची लागण लागणेची शक्यता नाकारता येत नाही. करीता महोदय, गावात साथरोगाची लागण होऊ नये म्हणून प्रत्येक नळ संयोजन खोदून सरळ करणे व गटारी वरील अतिक्रमणे काढून गटार मोकळी करणे ही कामे करणे आवश्यक आहे. तरी सदर कामाची अंदाजपत्रके तयार करुन तांत्रिक मान्यता मिळणेस विंनती आहे.

आपला नम्र.

प्रत :- म. तालुका वैद्यकीयअधिकारी भडगाव माहीतीसाठी सविनय सादर.
प्रत :- म. वैद्यकीयअधिकारी प्राथमिक आरोग्य केंद्र गुढे ता.भडगाव माहीती साठी सादर.

# गृप ग्राम पंचायत कार्यालय, शिंदी
## तालुका भडगाव, जिल्हा जळगाव

**दिनांक :- ०५/१२/२०१४**

***सार्वजनिक आरोग्य प्रथम प्राधान्य***

प्रति,
म.वैद्यकीय अधिकारी
प्राथमिक आरोग्य केंद्र
गुढे ता.भडगाव

**विषय :-** पाणी पुरवठयातील तृटी व टि.सी.एल.युक्त शध्द पाणी पुरवठा होणे बाबत.

**संदर्भ :-** जा.क्र.आरोग्य /साथरोग/११/२०१४ प्रा.आ.केंद्र, गुढे ता.भडगाव दिनांक २९/११/२०१४.

महोदय,

उपरोक्त संदर्भीय विषयान्वये केलेल्या कार्यवाहीचा अहवाल की, आपले पत्रात नमूद प्रमाणे व्हॉल गळती, पाईपलाईन गळती दुरुस्ती चे काम करणेत आलेले आहे. तसेच नळाचे खोल खड्डे बुजणे व नळाला तोटी बसविणे बाबतच्या नोटीसा प्रत्येक नळधारकास बजावण्यात आलेल्या आहेत व त्याअनुशंगाने खड्डे बुजणेचे काम चालू आहे. १०० टक्के खड्डे बुजणेसाठी संपुर्ण जलवाहीनी खोदून प्रत्येकाचे नळ संयोजन पाईपलाईनच्या ऊभ्या दिशेने करणे अत्यंत आवश्यक आहे. त्या साठी निधीची तरतूद करुन वरीष्टांच्या मार्गदर्शनाने लवकरच ग्रा.पं.मार्फत मोहिम हाती घेतली जाणार आहे.

ग्रा.पं.कडे मुबलक व योग्य प्रमाणात क्लोरिन असलेला टी.सी.एल.साठा उपलब्ध असून वेळोवळी पाणी चाचणी घेतली जात आहे. व चाचणी सकारात्मक येत आहे. तसेच पाण्याच्या टाकीजवळील स्वच्छता करणेत आलेली आहे. तसेच गावातील काही नळ संयोजन गटारी जवळ असलेचे सर्वेमध्ये आढळून आलेने ग्रा.पं.ने ताबडतोब सदरचे नळ कनेक्शन बंद केलेले आहेत. गावी शुध्द पाणी पुरवठा सुरु आहे, ग्रा.पं.दप्तरी टी.सी.एल.साठा रजिष्टर आद्यावत असून, पाणी चाचणी रजिष्टर आद्यावत भरलेले आहे.

सदरचा केलेल्या कार्यवाहीचा अहवाल सविनय सादर.

प्रत :- म.गट विकास अधिकारी पंचायत समिती,भडगाव माहीती साठी सविनय सादर.

प्रत :- म. तालुका वैद्यकीय अधिकारी भडगाव माहीतीसाठी सविनय सादर.

# ग्राम पंचायत कार्यालय गोंदेगाव

## तालुका सोयगाव जिल्हा औरंगाबाद

***हस्तबटवडयाने /रजिष्टर पोष्टाने*** दिनांक १५/११/२०१७

**प्रति,**

१) श्री. आन्ना किसन बिंदवाल रा.गोंदेगाव ता.सोयगाव जि.औरंगाबाद
२) श्री. अरविंद पांडरंग बिंदवाल रा.गोदेगाव ता.सोयगाव जि.औरंगाबाद

**विषय** :- सार्वजनिक रस्त्यात ओटयाचे बांधकाम करुन करीत असलेले अतिक्रमण त्वरीत थांबवून काढून घेणे बाबत.

संदर्भ :- १) महाराष्ट्र ग्राम पंचायत अधिनीयम १९५८ चे कलम ५३
२) महाराष्ट्र शासन महसुल व वन विभाग शासन परीपत्रक क्रमांक जमिन ०७/२०१३ प्र.क्र.३७४/ज/१ जागतिक व्यापार केंद्र, सेंटर वन इमारत, ३२ वा मजला कफ परेड मुंबई ४०००05 तारीख १० आक्टोबर २०१३

उपरोक्त संदर्भीय विषयान्वये आपणास गंभीरपणे सुचित करणेत येते कि, आपण व्यापारी गाळया समोरील सार्वजनिक रस्त्यात अनधिकृतपणे ओटयाचे बांधकाम करन अतिक्रमणे करीत असल्याचे ग्राम पंचायतीच्या निदर्शनात आले आहे. ही अत्यंत गंभीर बाब असून आपण नोटीस मिळताच सदरचे अतिक्रमण थांबवावे व केलेले अतिक्रमण नोटिस मिळाल्या पासुन सात दिवसाचे आत काढून घ्यावे अन्यथा आपल्या विरुध्द महाराष्ट्र ग्राम पंचायत अधिनीयम १९५८ चे कलम ५३ मधील तदतुदीनुसार कार्यवाही करुन अतिक्रमण काढून घेणेत येईल व येणारा खर्च आपल्या कडून जमिन महसूल म्हणून वसुल करणेत येईल. तसेच आपल्या विरुध्द फौजदारी स्वरुपाचा गुन्हा दाखल करणेत येईल व पुढील होणा-या दुष्परीणामास सर्वस्वी आपणच जबाबदार रहाल याची नोंद घ्यावी.

प्रत माहीती साठी सविनय सादर ..

१) म.तहसिलदार साहेब सोयगाव जि.औरंगाबाद

२) म.गट विकास अधिकारी पंचायत समिती सोयगाव

३) म.पोलिस निरीक्षक साहेब सोयगाव पोलिस स्टेशन सोयगाव जि.औरंगाबाद.

# गृप ग्राम पंचायत कार्यालय,शिंदी

## तालुका भडगाव जिल्हा जळगाव

दि-नांज  ३१/०८/२०१५

प्रति,
म.अप्पर जिल्हा निबंधक, जन्म व मृत्यू
तथा
गट विकास अधिकारी (उच्च श्रेणी)
पंचायत समिती, भडगाव

**विषय** :- महाराष्ट्र शासन राजपत्रा प्रमाणे जन्म नावात बदल करुन मिळणे बाबत.

**संदर्भ** :- १) श्री.पवन शांतराम पाटील मु.पो.चिंचखेडा ता.जि.धुळे यांचा दिनांक २६/०८/२०१५ अर्ज.

२) महाराष्ट्र शासन राजपत्र भाग दोन - नाव,वय,व धर्म बदलण्याच्या जाहीरातींचा विभागाकडील वर्ष १, अंक ओ (१०५) गरुवार ते बुधवार, जुलै१,२०१५ /आषाढ४-१०शजे ,१९३७

३) महाराष्ट्र जन्म आणि मृत्यू नोंदणी नियम २०००.

**महोदय,**

उपरोक्त संदर्भीय विषयान्वये विनंती की, अर्जदार श्री. पवन शांताराम पाटील यांचा जन्म ग्रा.पं.शिंदी हद्दीत शिंदी या महसुल गावी दिनांक १७/०३/१९९५ रोजी झालेला आहे. त्यांचे जन्म नाव जन्म दाखल्या वरुन आनंद आहे. अर्जदार यांनी महाराष्ट्र शासन राजपत्र भाग दोन - नाव,वय,व धर्म बदलण्याच्या जाहीरातींचा विभागाकडील वर्ष १, अंक ओ (१०५) गरुवार ते बुधवार, जुलै१,२०१५ /आषाढ४-१०शके,१९३७ यात नावात बदल केले प्रमाणे मुळ जन्म नोंद रजिष्टरला नोंद घेणे बाबत संदर्भ क्र.०१ नुसार विनंती केलेली आहे.

यास्तव याप्रकरणी महाराष्ट्र जन्म आणि मृत्यू नोंदणी नियम २००० चे अवलोकन केले असता त्यात नावात बदल करणे बाबत तरतुद आढळून आली नाही. तसेच या नियमातील कलम १५ चे तदतूदी नुसार नोंदीत दुरुस्ती करता येते किंवा ती रद्द करता येते, परंतू अर्जदार यांनी संदर्भ क्र.०२ मध्ये नमूद प्रमाणे नावात बदल करुन सदर बदलाची नोंद मुळ जन्मनोंद रजिष्टरला घेणेची विनंती केलेली आहे. तरी सदरचे राजपत्रात प्रसिध्द झाले प्रमाणे मुळ रजिष्टरला बदल करता येईल किंवा कसे या बाबत सविस्तर मार्गदर्शन होऊन योग्य ते आदेश होणेस विनंती.

सोबत संदर्भ क्र.०१ व २ च्या छायांकीत प्रती जोडल्या आहेत.

आपला नम्र

**निबंधक जन्म व मृत्यु**
**तथा**

# ग्राम पंचायत कार्यालय भातखंडे बु.

## तालुका भडगाव जिल्हा जळगाव

दिनांक / /२०१७

प्रति,

म. गट विकास अधिकारी (ऊच्च श्रेणी)
पंचायत समिती,भडगाव

विषय :- वैयक्तिक शौच्यालय बांधकाम करणे कामी अंदाजपत्रक तयार करुन तांत्रिक मान्यता मिळणे बाबत.

संदर्भ :- १) आपण दिनांक १०/०७/२०१७ रोजीच्या ग्रामसेवक आढावा सभेत दिलेल्या तोंडी सुचना.
२) जा.क्र./प.स.भ./आरआर/६६/पंचायत समिती,भडगाव दिनांक ०१/०९/२०१७.

आदरणीय महोदया,

ऊपरोक्त संदर्भीय विषयान्वये विनंती कि, भडगाव गटात दिनांक १०/०७/२०१७ पासुन स्वच्छ भारत मिशन अंतर्गत वैयक्तिक शौच्यालय बांधकामाचे काम मोठया प्रमाणावर प्रगतीत आहे हे आपणास ज्ञात आहेच सदरची प्रगती ही आपण वेळोवेळी आढावा सभेत **“मक्तेदाराकडून कामे करुन ऊद्दीष्ट पुर्ण करा”** अथवा **“ग्राम पंचायत एजन्सी म्हणून काम करा व ऊद्दीष्ट पुर्ण करा”** अशा प्रकारे ग्रामसेवकांना केलेल्या आवाहनाचे फलीत म्हणून आजची स्वच्छ भारत मिशन ची प्रगती आपणास दिसून येत आहे.

आदरणीय महोदया, आपण निर्गमित केलेले वरील संदर्भ क्र.२ चे पत्र पाहीले असता आपण त्यात ऊल्लेख केलेला आहे कि, **“पाणी पुरवठा स्वच्छता मिशन विभागाने तयार केलेल्या अंदाजपत्रका प्रमाणे काम करावे”** याचाच अर्थ असा होतो कि, झालेल्या शौच्यालय बांधकामाची मुल्यांकने देखील घ्यावेत. महोदया, आपल्या गटात स्वच्छ भारत मिशन अंतर्गत दिनांक १०/०७/२०१७ पासुन आज पर्यंत जी कामे झालेली आहेत त्या कामांची अंदाजपत्रके तयार करुन तांत्रिक मान्यता मिळावी तसेच आजपर्यंत झालेल्या कामांचे मुल्यांकन करुन मिळावे. जोपर्यंत सदर कामांचे अंदाजपत्रके तयार करुन तांत्रिक मान्यता देऊन मुल्याकने करुन मिळणार नाही तोपर्यंत स्वच्छ भारत मिशन अंतर्गत पुढील कामे ग्राम पंचायती कडून करणेत येणार नाही त्यामुळे दिलेल्या मुदतीत ऊदीष्ट पुर्ती न झाल्यास पंचायत समिती कार्यालय व सर्व संबंधित जबाबदार राहतील.

तसेच ग्राम पंचायत शिंदी ता.भडगाव येथे म.गांधी राष्ट्रीय ग्रामिण रोजगार हमी योजने अंतर्गत वैयक्तिक शौच्यालय बांधकामांना तांत्रिक व प्रशासकीय मान्यता देणेत आलेली आहे सदर शौच्यालयांचे हजेरीपत्रके एम.आय.एस.करणेत आली होती परंतू पंचायती समिती कार्यालयातून परस्पर शुन्य हजेरी दर्शवून काम बंद करणेत आले त्यामुळे ज्या लाभार्थ्यांना आम्ही ऊद्दीष्ट पुर्ती साठी शौच्यालय बांधकामास प्रवृत्त केले होते त्या लाभार्थ्यांना कुशल व अकुशल रकमांचा लाभ मिळाला नाही त्यामुळे ते लाभार्थी दररोज आमचेशी ग्राम पंचायतीमध्ये येऊन हुज्जत घालत आहेत व गावात **''ग्रामसेवक तसेच पंचकमेटी लबाड आहेत''** असा अपप्रचार गावात करीत आहेत त्यामुळे गावातील इतर लोकांचा आमच्या वरील असलेला विश्वास धोक्यात आलेला आहे व स्वच्छ भारत मिशन चे पात्र लाभार्थी देखील आमच्याकडे संशयाच्या नजरेने पाहत आहेत.

तरी महोदया, विनंती कि,

१) आता पर्यंत झालेल्या शौच्यालय कामाचे अंदाजपत्रके तयार करुन तांत्रिक मान्यता मिळावी तसेच झालेल्या सर्व शौच्यालय बांधकामांचे मुल्यांकन करुन मिळावे

२) म.गांधी राष्ट्रीय ग्रामिण रोजगार हमी योजने अंतर्गत मंजूर असलेल्या कामांबाबत त्वरीत योग्य तो निर्णय व्हावा.

३) वरील प्रमाणे कार्यवाही जो पर्यंत होत नाही तो पर्यंत कामाची गती कमी राहील व विहीत मुदतीत ऊद्दीष्ट साद्य होणेस अडचणी निर्माण होतील.

**मुंबई ग्राम पंचायत अधिनीयम १९५८ चे कलम ५३ प्रमाणे अतिक्रमण काढणे बाबतची नोटीस बांधकाम कामगार अधिनीयम १९९६ चे कलम १० नुसार नोंदणी अधिकारी यांचे कडून बांधकामाची नोंदणी करणे बाबत.नोटीस**

ग्राम पंचायत म्हसास
ता.पाचोरा जि.जळगाव
दि-ांक :-

प्रति,

**श्री.सखाराम माधव पाटील रा.म्हसास ता.पाचोरा जि.जळगाव.**

विषय :- ग्राम पंचायत मालकीच्या गावठान जागेवर अनधिकृत रित्या घराचे बांधकाम सुरु करुन करीत असलेले अतिक्रमण त्वरीत थांबवून काढून घेणे बाबत.

संदर्भ :- १) आपण ग्रा पं. मालकीच्या सार्वजनिक गावठान जागेवर घराचे बांधकाम करुन करीत असलेले अतिक्रमण.
२) आपणास वेळोवळी ग्राम पंचायतीने दिलेल्या तोंडी सुचना.
३) --------------------------------------------------------------------------------

वरील संदर्भिय विषयान्वये आपणास गंभीरपणे सुचित करणे येते की, आपण सार्वजनिक गावठान जागेवर घराचे बांधकाम करुन अतिक्रमण करीत असले बाबत ग्रा.पं.च्या निदर्शनात आले आहे. करीता आपण नोटीस मिळताच अतिक्रमण थांबवावे व नोटिस मिळाले पासून सात (७) दिवसाचे आत अतिक्रमण काढून घ्यावे अन्यथा ग्रामपंचायत मुंबई ग्रा.पं. अधिनीयम १९५८ चे कलम ५३ प्रमाणे कार्यवाही करुन अतिक्रमण काढुन घेईल व येणारा खर्च जमिन महसूल म्हणून आपणाकडून वसुल करणेत येईल, तसेच नोटीसीची मुदत संपलेवर नियमाप्रमाणे दंड आकारणी करणेत येईल, करीता आपण त्वरीत सदरचे अतिक्रमण थांबवून काढून घ्यावे, अन्यथा पुढिल होणा-या दुष्परीजामास सर्वस्वी आपणच जबाबदार रहाल याची नोंद घ्यावी.

तसेच आपण ग्राम पंचायतीची कोणत्याही प्रकारची परवानगी न घेता बांधकाम करीत आहात म्हणजेच आपण मुंबई ग्राम पंचायत अधिनीयम १९५८ चे कलम ५२ चा भंग करीत आहात ही अत्यंत गंभीर बाब आहे. सदर बांधकामाची इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार व सेवा शर्ती नियमन) १९९६ च्या कलम १० नुसार नोंदणी अधिकारी यांचे कडे बांधकामाची नोंदणी करुन बांधकामाचा आराखडा (नकाशा) ,अंदाज पत्रक तयार करुन व बांधकामाच्या अंदाजित रकमेच्या ०१ टक्के उपकर भरुन रितसर परवानगी घेऊन बांधकाम करावे अन्यथा या अधिनीयमांच्या कलम ५० नुसार या अधिनयमातील तरतुदींचा भंग केल्यास रु.१०००/- इतका दंड आणि तरतुदींचे पालन करे पर्यंत प्रत्येक दिवसा करीता रु.१००/- इतक्या दंडास पात्र व्हाल. तसेच आपण बांधकामा संबधि कलम ४६ नुसार ची सुचना आपण न दिल्यास आपणास तिन महीन्या पर्यंत कैद किंवा रु.२०००/- पर्यंत दंड अशी तरतुद कलम ४८ मध्ये आहे, त्यास आपण पात्र व्हाल याची गांभीर्याने नोंद घ्यावी अन्यथा पुढील होणा-या दुष्परीणास सर्वस्वी आपणच जबाबदार रहाल याची नोंद घ्यावी.

ग्राम सेवक
ग्राम पंचायत म्हसास
ता.पाचोरा जि.जळगाव

सरपंच
ग्राम पंचायत म्हसास
ता.पाचोरा जि.जळगाव

प्रत :- म.गट विकास अधिकारी (उच्च श्रेणी) पंचायत समिती पाचोरा, माहीती साठी सविनय सादर

ग्राम सेवक
ग्राम पंचायत म्हसास
ता.पाचोरा जि.जळगाव

सरपंच
ग्राम पंचायत म्हसास
ता.पाचोरा जि.जळगाव

# ग्राम पंचायत कार्यालय, वडगावनालबंदी

## तालुका भडगाव जिल्हा जळगाव

**दि-नांज** /११ /२०१७

**महाराष्ट्र ग्राम पंचायत अधिनीयम १९५८ चे कलम ५३/२ प्रमाणे अतिक्रमण काढणे बाबत नोटीस**

**प्रति,**

श्री.-------------------------------------------------------- रा.वडगावनालबंदी ता.भडगाव जि.जळगाव

**विषय** :- सार्वजनिक जागेवर अनधिकृत रित्या शौचालयाची टाकीचे बांधकाम करुन केलेले अतिक्रमण त्वरीत काढून घेणे बाबत.

**संदर्भ** :- १) श्री.सुग्राबाई सरदार जाधव रा.वडगावनालबंदी ता.भडगाव जि.जळगाव यांचा दिनांक ०७/११/२०१७ प्राप्त दिनांक १४/११/२०१७

वरील संदर्भिय विषयान्वये आपणास गंभीरपणे सुचित करणे येते की, आपण सार्वजनिक जागेवर अनधिकृत रित्या शौचालयाची टाकीचे बांधकाम करुन अतिक्रमण करीत असले बाबत ग्रा.पं.च्या निदर्शनात आले आहे. करीता आपण नोटीस मिळताच अतिक्रमण थांबवावे व नोटिस मिळाले पासून दहा (१०) दिवसाचे आत अतिक्रमण काढून घ्यावे अन्यथा ग्रामपंचायत मुंबई ग्रा.पं. अधिनीयम १९५८ चे कलम ५३/२ प्रमाणे कार्यवाही करुन अतिक्रमण काढुन घेईल व येणारा खर्च जमिन महसूल म्हणून आपणाकडून वसुल करणेत येईल, तसेच नोटीसीची मुदत संपलेवर नियमाप्रमाणे दंड आकारणी करणेत येईल, करीता आपण त्वरीत सदरचे अतिक्रमण थांबवून काढून घ्यावे, अन्यथा पुढिल होणा-या दुष्परीणामास सर्वस्वी आपणच जबाबदार रहाल याची नोंद घ्यावी.

सरपंच<br>
ग्राम पंचायत वडगावनालबंदी<br>
ता. भडगाव जि.जळगाव

**प्रत** म.तहसिलदार साहेब भडगाव साठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी सविनय सादर

**प्रत** म.गट विकास अधिकारी पंचायत समिती, भडगाव माहीती साठी सविनय सादर

**प्रत** म. पोलिस निरीक्षक साहेब भडगाव पोलिस स्टेशन माहीतीसाठी सविनय सादर

सरपंच<br>
ग्राम पंचायत वडगावनालबंदी<br>
ता. भडगाव जि.जळगाव

# ग्राम पंचायत कार्यालय --------

## तालुका -------- जिल्हा जळगाव

***हस्तबटवडयाने /रजिष्टर पोष्टाने*** दिनांक / /२०१

प्रति,

श्री/ श्रीमती -----------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------

विषय :- बांधकाम परवानगी मिळणे बाबत.

संदर्भ :- १) आपला बांधकाम परवानगी मिळणे बाबतचा दिनांक / /२०१७

२) महाराष्ट्र शासन ग्राम विकास विभाग शासन निर्णय क्रमांक व्हीपीएन-२०१५ /प्रक्र-३९/परा-४/बांधकाम भवन,२५,मर्झबान मार्ग, फोर्ट मुंबई-४००००१ तारीख ११ डिसेंबर २०१५

३) महाराष्ट्र शासन ग्राम विकास विभाग शासन निर्णय क्रमांक व्हीपीएन-२०१५ /प्रक्र-३९/परा-४/बांधकाम भवन,२५,मर्झबान मार्ग, फोर्ट मुंबई-४००००१ तारीख ११ डिसेंबर २०१५

उपरोक्त संदर्भीय विषयान्वये आपणास कळविणेत येत कि आपण दिलेल्या अर्जासोबत खालील प्रमाणे कागदपत्रांची पुर्तता करणे आवश्यक आहे तरी खालील प्रमाणे कागदपत्रांची पुर्तता करुन अर्ज अर्ज सादर करावा.

१) जागेचा निर्वीवाद मालकी बाबतचा अधिकार अभिलेख
(७/१२ ऊतारा/न.नं.८ ऊतारा/सि.स.मिळकत पत्रिका जो लागु असेल तो)
२) बिनशेती भुखंड असेल तर लेआऊट, बिनशेती आदेश
३) बांधकाम नकाशा,
४) बांधकामाचे अंदाजपत्रक
५) सि.स.ची जागा असेल तर मिळकत पत्रिका व नकाशा.

वरील प्रमाणे कागदपत्रांची पुर्ताता करुन प्रकरण सादर करावे म्हणजे वरीष्ठाकडे सदरचे प्रकरण पुर्व मंजूरी कामी सादर करता येईल.

**ग्रामसेवक**
**ग्राम पंचायत --------**
**ता.------ जि.जळगाव**

प्रत - म.गट विकास अधिकारी (ऊच्च श्रेणी) पंचायत समिती --------- माहीतीसाठी सविनय सादर.

# ग्राम पंचायत कार्यालय --------

## तालुका जामनेर जिल्हा जळगाव

***हस्तबटवडयाने /रजिष्टर पोष्टाने*** दिनांक / /२०१

प्रति,

म.गट विकास अधिकारी (ऊच्च श्रेणी)
पंचायत समिती, जामनेर

विषय :- बांधकाम परवानगी देणे कामी पुर्वपरवानगी देणे बाबत.

संदर्भ :- १) श्री ---------------------------- यांचा दिनांक चा
दिनांक / /२०१ चा अर्ज
२) महाराष्ट्र शासन ग्राम विकास विभाग शासन निर्णय क्रमांक व्हीपीएन २०१५ /प्रक्र-३९/परा-४/बांधकाम भवन,२५,मर्झबान मार्ग, फोर्ट मुंबई- ४००००१ तारीख ११ डिसेंबर २०१५
३) महाराष्ट्र शासन ग्राम विकास विभाग शासन निर्णय क्रमांक व्हीपीएन-२०१५ /प्रक्र-३९/परा-४/बांधकाम भवन,२५,मर्झबान मार्ग, फोर्ट मुंबई-४००००१ तारीख ११ डिसेंबर २०१५

आदरणीय महोदय,

उपरोक्त संदर्भीय विषयान्वये विनंती कि ग्राम पंचायती कडे वरील संदर्भ क्रमांक १ नुसार बांधकाम परवानगी मिळणे बाबतचा अर्ज या कार्यालयास दिनांक / /२०१ रोजी प्राप्त झालेला असून वरील संदर्भ क्रमांक २ व ३ चे शासन निर्णय व परीपत्रकातील मार्गदर्शक सुचना प्रमाणे नगर रचनाकार यांची पुर्वपरवानगी घेऊनच बांधकाम परवानगी देणे अपेक्षीत आहे तरी सोबत बांधकाम परवानगी मिळणे बाबत संदर्भ क्र.१ चे प्रकरण सोबत जोडलेले आहे तरी पुर्वमंजूरी बाबत पुढील योग्य तर कार्यवाही होणेस विनंती.

सोबत - मुळ प्रकरण सहपत्र ०१ ते जोडलेले आहे.

आपली विश्वासु

**ग्रामसेवक**
**ग्राम पंचायत वाकी खुर्द**
**ता.जामनेर जि.जळगाव**

# ग्राम पंचायत कार्यालय आखतवाडे

## ता.पाचोरा जि.जळगाव

दि-नांक /०६/२०१६

## नाहरकत प्रमाणपत्र

प्रति,

श्री.किलाचंद भिकनचंद जैन रा.वरखेडी ता.पाचोरा जि.जळगाव

विषय :- नाहरकत दाखला मिळणे बाबत ...

सुदर्भ :- १) अपला दिनांक /०६/२०१६ चा अर्ज
२) ग्रा.पं. मासिक सभा ठराव क्रमांक दिनांक / /२०१६

उपरोक्त सुदर्भीय विषयान्वये कळविणेत येते की आपण दिलेल्या अर्जा प्रमाणे आखतवाडे ता. पाचोरा येथील शेत जमिन **२७१/१/२ क्षेत्र ००.५९ हेक्टर आकार ०४.०० रुपये** या आपल्या मालकीच्या शेत जमिनीत विनशेती भुखंड करणे कमी खलील अटी शर्तीचे अधिन राहून नाहरकत प्रमाणपत्र देणेत योते आहे.

१) सदरचा नाहरकत दाखला म्हणजे परवानगी नाही. आपणास सक्षम अधिकारी यांची परवानगी घेणे बंधनकारक राहील

२) नियमाप्रमणे सोडलेला खुला भुखंड ग्रा.पं.चे नावावर करुन देणे बंधनकारक राहील.

३) बिनशेती आदेशात नमुद सर्व अटी व शर्तीचे पालन करणे आपणावर बंधनकारक राहील

४) नगरभुमापन विभागा कडून भुखंडांचे सिमांकन करुन नंतरच भुखंडांची विक्री करावी

५) नियमाप्रमाणे गटारी, रस्ते , सांडपाण्याची व्यवस्था, तसेच विजेची व्यवस्था करणे विकासकास बंधनकारक आहे.

वरील प्रमाणे अटी व शर्तीचे अधिन राहून आपणास उपरोक्त शेत जमिनीत बिन शेती भुखंड पाडणेस ग्राम पंचायतीची हरकत नाही.

स्थळ :- आखतवाडे ता.पाचोरा

दि-नांक :- /०६/२०१६

# प्रोसिडींग बुक

आज दिनांक ३१/०५/२०१६ रोजी ग्राम पंचायत आखतवाडे ता.पाचोरा येथील मासिक सभा म.सरपंच यांचे अध्यक्षते खाली ग्राम पंचायत कार्यालयात सकाळी ठिक १०.०० वाजता घेणेत आली त्यात खालील प्रमाणे ठराव पास करणेत आला.

**विषय क्रमांक** ०५/1 श्री.किलाचंद भिकनचंद जैन रा.वरखेडी ता.पाचोरा यांना त्यांच्या मालकीच्या गट नं. २७१/१/२ क्षेत्र ००.५९ आकार ०४.०० रुपये या शेतजमिनीत बिनशेती भुखंड टाकणे कामी नाहरकत प्रतमाणपत्र देणे बाबत.

**ठराव क्रमांक** ०५ /१ श्री.किलाचंद भिकनचंद जैन रा.वरखेडी ता.पाचोरा यांना त्यांच्या मालकीच्या गट नं. २७१/१/२ क्षेत्र ००.५९ आकार ०४.०० रुपये या शेतजमिनीत बिनशेती भुखंड टाकणे कामी नाहरकत प्रतमाणपत्र देणे बाबत चा अर्ज ग्रा.पं.सचिव यांनी सभेसमोर वाचुन दाखवला तसेच समजवून सांगीतला तरी सदर गटात बिनशेती भुखंड पाडणेकामी ग्रा.पं.ची काहीएक हरकत नाही तरी त्यांना प्रचलित नियमाप्रमाणे अटी व शर्तीचे आधिन राहून नाहरकत प्रमाणपत्र देणेत यावे असे सर्वानुमते ठरले

सुचक - श्री.सुरेश परशराम निुंभ

अनुमोदक - श्री.जाकिर शे.अजिज

ठराव सर्वानुमते मंजूर

अस्सल रजिष्टर वरुन नक्कल दिली असे.

स्थळ :- आखतवाडे ता.पाचोरा

दिनांज :- ०५.०६.२०१६

# प्रोसिडींग बुक

आज दिनांक १७/०६/२०१६ रोजी ग्राम पंचायत आखतवाडे ता.पाचोरा येथील मासिक सभा म.सरपंच यांचे अध्यक्षते खाली ग्राम पंचायत कार्यालयात सकाळी ठिक १०.०० वाजता घेणेत आली त्यात खालील प्रमाणे ठराव पास करणेत आला.

विषय क्रमांक ०५ मौजे आखतवाडे ता.पाचोरा येथील अनुसूचित जाती व नवबौध्द घटक वस्तीचा विकास करणे योजने अंतर्गत मंजूर रस्ता काँक्रीटीकरण करणे चे कामा बाबत चर्चा करणे.

ठराव क्रमांक ०५ मौजे आखतवाडे ता.पाचोरा येथील अनुसूचित जाती व नवबौध्द घटक वस्तीचा विकास ज्रजे योजने अंतर्गत मंजूर रस्ता काँक्रीटीकरण करणे चे कामा बाबत ग्राम पंचायत सभासदांमध्येसविस्तर चर्चा घडून आली, तरी आपल्या गावी या योजनेअंतर्गत रुपये ४९९९९१.०० (अक्षरी रुपये चारलक्ष नव्यांनवहजार नवुशेएक्क्यांनव) मात्र अंदाजपत्रकिय रकमेचे काम मंजूर असून,सदरचे काम ग्राम पंचायत डिपार्टमेंटल पध्दतीने करणार आहे, सदरचे कामाचे सविस्तर अंदाजपत्रकाचे अवलोकन केले असता सदरच्या कामासाठी लागणारे सिमेंट साहीत्यासाठी अंदाजपत्रकिय तरतूद ही एक लक्ष रुपयांपेक्षा जास्त किमतीची आहे. परंतू ग्राम विकास विभागाचे शासन निर्णय क्रमांक निवीदा २०१४ प्र.२६०/पं.रा./०७ दिनांक २५ मे २०१५ अन्वये जर हे ज्ाम ग्रा.पं.डिपार्टमेंटल पध्दतीने करणार असेल तर सदर सिमेंट साहीत्य खरेदी याठी ई- टेंडरिंग करणे आवश्यक आहे असे सचिव यांनी सभेच्या निदर्शनत आणून दिले, परंतू आपल्या कडे नेटची सुविधा नाही व आपण ग्राम पंचायत ही महाराष्ट्र ग्राम पंचायत लेखासंहीता २०११ मधील तदतूदी नुसार स्थानिक वृत्त पत्रात जाहीरात देऊन साहीत्य खरेदीच्या कोटेशन (भावपत्रज्े ) मागवणार आहोत असे सर्व ग्रा.पं.सभासदांनी सांगीतले तरी सदरचे काम हे ग्रा.पं. पंचायत मजूर लाऊन डिपार्टमेंटल पध्दतीने करणार असलेने ई- टेंडरींग न करता स्थानिक वृत्तपत्रात जाहीरात देऊन साहीत्य खरेदीच्या कोटेशन (भावपत्रज्े ) मागवून, तुलनात्मक तक्ता तयार करुन कमीत कमी भावाची कोटेशन (भावपत्रज्े ) म.सरपंच यांनी मंजूर करावी असे सर्वानुमते ठरले.

सुचक - श्री.सुरेश परशराम िनुं भ

अनुमोदक - श्री.जाकिर शे.अजिज

ठराव सर्वानुमते मंजूर

अस्सल रजिष्टर वरुन नक्कल दिली असे.

स्थळ :- आखतवाडे ता.पाचोरा

दिनांज :- १७.०६.२०१६

# प्रोसिडींग बुक

आज दिनांक ०२/१०/२०१६ रोजी ग्राम पंचायत लोढे ता.चाळीसगाव येथील ग्रामसभा म.सरपंच यांचे अध्यक्षतेखाली कृष्णापुरी तांडा येथे मंदीर आवारात सकाळी ठिक ०९.०० वाजता घेणेत आली त्यात खालील प्रमाणे ठराव पास करणेत आला.

विषय क्रमांक ०७ आलेल्या अर्जांचे वाचन करुन चर्चा करणे

(१) लोंढे विवीध कार्यकारी सेवा सहकारी संस्थेस ऑफिस साठी जागा मिळणे बाबत.

ठराव क्रमांक ०७/१ ग्राम पंचायत सचिव यांनी लोंढे विवीध कार्यकारी सेवा सहकारी संस्थेचा जागा मागणी बाबतचा अर्ज सभेसमोर वाचुन दाखवला तसेच समजवून सांगीतला यावर सर्व उपस्थित ग्रामस्थांमध्ये सविस्तर चर्चा घडुन आली, चर्चेअंती ग्रामस्थांनी सांगीतले कि, आपल्या गावाच्या विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटीस स्वतःची इमारत बांधकामासाठी जागा नाही त्यामुळे विकास सोसायटीस इमारत बांधकाम करता येत नाही म्हणून ग्राम पंचायत मालकिच्या आता पडक्या स्वरुपात असलेली जुन्या अंगणवाडी इमारतीची जागा ग्रा.पं.मिळकत क्रमांक ------- ही संपुर्ण जागा विकास सहकारी सोसायटी लोंढे याना कायमस्वरुपी विना मोबदला देणेत यावी असे सांगीतले, यावर ग्रा.पं.सचिव यांनी सभेच्या निदर्शनात आणुन दिले कि, **"जा.क्र.ग्रा.पं.-१/२/३/आरआर /११९/२०१३ ग्राम पंचायत विभाग, जि.प.जळगाव दिनांक १९/०३/२०१३ मधील सर्व सुचना सभेसमोर वाचुन दाखवल्या तसेच समजवून सांगीतल्या सदर सुचनांनुसार अशा प्रकारे जागा देणेत येऊ नये व अशा प्रकारचे प्रस्ताव पाठवु नये अशा स्पष्ट सुचना आहेत"**

असे असतांना देखील सर्व ग्रामस्थांनी सांगीतले कि, ग्रामसभा ही गावाची विधानसभा आहे ग्रामसभेला सर्वोच्य अधिकार आहे व सदरचा विषय हा गावाचा विषय आहे आम्ही गावलोक ठराव करतो कि, सदरची ग्रामपंचायत मालकीची मिळकत क्रमांक ----- ही विकास सह सोसायटी लोंढे यांना देणेसाठी वरीष्टांनी परवानगी दिल्यास जागा देणेस हरकत नाही. असा ठराव ही सभा सर्वानुमते करीत आहे.

सुचक :- श्री.गोविंद महारु भोसले
अनुमोदक :- श्री.निलेश दतात्रय भोसले

ठराव सर्वानुमते मंजूर
अस्सल रजिष्टर वरुन नक्कल दिली असे.
स्थळ :- लोंढे ता.चाळीसगाव
दिनांक :- ०२/१०/२०१६

# ग्राम पंचायत कार्यालय लोंढे

## तालुका चाळीसगाव जिल्हा जळगाव

दिनांक १०/१०/२०१६

प्रति,

म.मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परीषद, जळगाव

द्वारा - म.गट विकास अधिकारी (ऊच्च श्रेणी)
पंचायत समिती,चाळीसगाव

विषय :- प्रतिकुल शेरा असलेल्या ठरावा बाबत अवगत करणे बाबत.
संदर्भ :- ग्रामसभा ठराव क्रमांक ७/१ दिनांक ०२/१०/२०१६

महोदय,

उपरोक्त संदर्भीय विषयान्वये विनंती पुर्वक व नम्रपणे निवेदन कि, ग्राम पंचायत लोंढे ता.चाळीसगाव येथे दिनांक ०२/१०/२०१६ रोजी च्या ग्रामसभेत प्रतिकुल शेरा असलेला ठराव पारीत झालेला आहे सदर ठरावाची प्रत माहीती साठी सोबत जोडलेली आहे तरी महोदय, माहीतीसाठी सविनय सादर.

सोबत - ग्रामसभा ठराव क्रमांक ७/१ दिनांक ०२/१०/२०१६

आपला नम्र.

# ग्राम पंचायत कार्यालय, पिचर्डे

## तालुका भडगाव, जिल्हा जळगाव

**दिनांक :-   /१२/२०१४**

**प्रति,**

श्री. विश्राम सोनु कोळी रा.पिचर्डे ता.भडगाव जि.जळगाव

**विषय :-** ग्राम पंचायत पिचर्डे ता.भडगाव जि.जळगाव यांचे कडील दिनांक २०/०१/२०१३ रोजीचे पत्र

**संदर्भ :-** १) आपले कडील दिनांक २७/११/२०१४ चे म.तहसिलदार साहेब भडगाव यांचे कडून आलेले व त्यावर आपली स्वाक्षरी नसलेले पत्र.

२) म.तहसिलदार भडगाव यांचे कडील पत्र क्र./कुळका/कावि/   /२०१४ दिनांक ०३/१२/२०१४.

३) महाराष्ट्र ग्राम पंचायत अधिनीयम १९५८ चे कलम ५३.

उपरोक्त संदर्भीय विषयान्वये कळविणेत येतें की, आपले अर्जात नमूद प्रमाणे आपल्याला पिचर्डे ता.भडगाव गावठाण हद्दीतील गट नं. २६३ पैकी भुखंड क्रमांक ९ हा आपणास अलॉट केलेला आहे व शासनाने आलॉट करते वेळी आपणास रितसर ताबा दिनांक १७/०६/१९८० रोजी दिलेला आहे व तसा ताबा मिळाले बाबतचा करारनामा आपणाकडून करुन नंतरच महसुल दप्तरी फेरफार नोंद क्रमांक २४७ करणेत आली असून, आपणास महसुल विभागाकडून भुखंडाचा ताबा देऊन आता तब्बल ३५ वर्ष झालेले आहे. गेल्या ३५ वर्षे महसुल विभागाने आपल्या ताब्यात दिलेला भुखंड आपण वंशपरंपरागत ताब्यात ठेऊन निरंतर रहीवास उपयोगासाठी अथवा विहीत प्रयोजनासाठी वापरावयाचा होता. तसेच आपल्या ताब्यात दिलेल्या भुखंड कोणी दुसरा व्यक्ती अनाधिकाराने कब्जा करीत असेल किंवा होता तर आपण वेळीच त्यांचे विरुध्द यथोचित तक्रार नोंदवायला पाहीजे होती, अथवा नोंदवली पाहीजे.

यास्तव प्रस्तुत प्रकरणी आपणास सुचित करणेत येते कि, आपण केलेल्या अर्जावर आपली स्वाक्षरी नाही, त्यामुळे अर्जाबाबतची सत्यता पडताळणी करता येत नाही. तसेच आपल्या ताब्यात दिलेला भुखंड सांभाळण्याची सर्वस्वि जबाबदारी आपली आहे. ग्राम पंचायतीस खाजगी जागेवरचे अतिक्रमण काढणेचे अधिकार नाही. ग्राम पंचायतीला महाराष्ट्र ग्राम पंचायत अधिनीयम १९५८ चे कलम ५३ नुसार सार्वजनिक जागा ग्रा.पं. मालकीच्या जागेवरील अतिक्रमणे काढणेचा अधिकार आहे. त्यामुळे ग्राम पंचायत आपल्या भुखंडावरील अतिक्रमण काढून आपणास भुखंडाचा ताबा देऊ शकत नाही. आपण सदनशिर मार्गाने आपल्या भुखंडावरी अतिक्रमण काढून घ्यावे.

तसेच आपण अर्जात नमूद केल्या प्रमाणे ऊपोषणाचा मार्ग अवलंबू नये. ऊपोषणाच्या मार्गापासुन परावृत्त व्हावे. ही विनंती. कळावे.

प्रत :- म.तहसिलदार साहेब भडगाव ता.भडगाव माहीती साठी सविनय सादर.
प्रत :- म.गट विकास अधिकारी पंचायत समिती, भडगाव माहीतीसाठी सविनय सादर.
प्रत :- म.पोलीस निरीक्षक भडगाव पोलिस स्टेशन भडगाव माहीती साठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी सादर.

***कारणे दाखवा नोटीसचे विनम्रपणे ऊत्तर***

वासुदेव पुंडलिक पाटील ग्रामसेवक ग्राम पंचायत लोंढे
ता.चाळीसगाव दिनांक १५/१०/२०१६

प्रति,

म.गट विकास अधिकारी (उच्च श्रेणी)
पंचायत समिती,चाळीसगाव

विषय :- दिनांक २९/०९/२०१६ रोजी ग्राम पंचायत कार्यालयात अनधिकृत गैरहजेरी बाबत

संदर्भ :- जा.क्र./ग्रा.पं./आस्था/आरआर/३७४/२०१६ पंचायत समिती,चाळीसगाव दिनांक २९/०९/२०१६ (साध्या पोष्टाने प्राप्त दिनांक १३/१०/२०१६)

आदरणीय महोदय,

उपरोक्त संदर्भीय विषयान्वये मी वासुदेव पुंडलिक पाटील ग्रामसेवक ग्राम पंचायत लोंढे ता.चाळीसगाव विनंती पुर्वक प नम्रपणे खुलासा कि, वरील संदर्भीय कारणे दाखवा नोटीस मला साध्या पोष्टाने दिनांक १३/१०/२०१६ रोजी ग्राम पंचायत लोंढे ता.चाळीसगाव च्या पत्त्यावर प्राप्त झालेली आहे, सदर नोटिशीत नमुद माझ्या विरुध्द नोंदवलेले आक्षेपाचे वाचन करुन सदर आक्षेपा बाबत खालील प्रमाणे खुलासा अतिशय विनम्रपणे सादर करीत आहे

१) आपण सहाय्यक गट विकास अधिकारी व विस्तार अधिकारी (ग्रा.पं.) पंचायत समिती,चाळीसगाव यांनी दिनांक २९/०९/२०१६ रोजी ग्राम पंचायत कार्यालय लोंढे ता.चाळीसगाव येथे अचानक भेट दिली असता मी गैरहजर असलेलचे आढळून आल्याचे नमुद आहे तसेच या दिवसाची व्हॉटसअप ला गैरहजेरी दिसुन आल्याचे नमुद आहे, परंतू महोदय, मी दिनांक २९/०९/२०१६ रोजी ग्राम पंचायत कार्यालयात दुपारी १३.३० वाजेपर्यंत दैनंदीन कामकाज करुन नंतर आपल्या तोंडी सुचनेनुसार आमचा गाव आमचा विकास आराखडा व इतर रिपोर्ट सादर करणे कामी पंचायत समिती,चाळीसगाव येथे हजर होतो या बाबत आदरणीय संजयजी निकम जिल्हाअध्यक्ष ग्रामसेवक संघटना जळगाव यांना अवगत करणेत आलेले आहे. तसेच महोदय, मला सदर दौ-या बाबत पुर्व कल्पना नसल्याने व सदर आराखडा व इतर रिपोर्ट सादर करणे आवश्यक असलेने मी ग्रा.पं.ला आपणास गैरहजर आढळून आलो आपण मला भ्रमणघ्वनी द्वारे दौ-याची कल्पना दिली असती तर कदाचित असे घडले नसते.

२) आदरणीय महोदय, या दिवशी व्हॉटसअप वर माझी गैरहजेरी आपणास दिसुन आल्याचे नमूद आहे महोदय, मी आपणस अतिशय विनम्रपणे कळवू इच्छीतो कि, आपण दिनांक २९/०९/२०१६ ची गोपम प्रणाली च्या व्हॉटसअप वरील हजेरी बाबतचा डेडा कृपया तपासून पाहावा त्यात मी आपणास गोपम प्रणालीच्या व्हॉटयअप वर हजेरी बाबतचे छायाचित्र टाकलेले असल्याचे दिसून येईल.

करीता महोदय, आपणास विनंती कि, मी नोटीशीत नमूद दिवशी ग्रा.पं.ला गैरहजर नाही व माझे गोपम प्रणाली च्या व्हॉटसअप वर कामकाजाचे छायाचित्र अपलोड केलेले असलेने माझे विरुध्द नोटिशीत नमूद केलेली कोणत्याही प्रकारची प्रशासकिय कार्यवाही करणेत येऊ नये ही आपणास विनम्र प्रार्थना आहे.

आपला नम्र

(वासुदेव पुंडलिक पाटील ग्रा.से.लोंढे)

प्रत माहीती साठी सविनय सादर.

१) म.उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा.पं.) जिल्हा परीषद,जळगाव

# प्रोसिडींग बुक

आज दिनांक     /    /२०१  रोजी ग्राम पंचायत वाघोदा बु. तालुका रावेर जि.जळगाव येथील मासिक सभा म.सरपंच यांचे अध्यक्षते खाली सकाळी ठिक        वाजता ग्राम पंचायत कार्यालयात घेणेत आली त्यात खालील प्रमाणे ठराव पास करणेत आला.

**विषय क्रमांक** :-  गट नं. १०३ व्यवसाईक अकृषक परवानगी आणि भारत पेट्रोलियम कार्पोरेशन लि.चे रिटेल आऊटलेट चालु करणे साठी नाहरकत दाखला मिळणे बाबत.

**ठराव क्रमांक** :-  श्री.कुलदिप जगदीश पाटील व जगदीश देवराम पाटील दोघे रा.वाघोदे बु.ता.रावेर जि.जळगाव यांच्या मालकीच्या वाघोदे बु.शिवारातील गट क्रमांक १०३ क्षेत्र ००.८७ हेक्टर  पो.ख.०.०१ पैकी पुर्वेकडील भाग ००.४० हेक्टर व्यवसाईक अकृषक करणे कामी चा श्री.कुलदिप जगदीश पाटील व जगदीश देवराम पाटील दोघे रा.वाघोदे बु.ता.रावेर  जि.जळगाव यांचा दिनांक १०/११/२०१७ रोजीचा फक्त जगदिश देवराम पाटील यांची स्वाक्षरी असलेला अर्ज ग्राम पंचायत सचिव यांनी सभेसमोर वाचुन दाखवला तसेच समजवून सांगीतला तसेच महाराष्ट्र शासन ग्राम विकास विभाग शासन परीपत्रक क्रमांक व्हीपीएम२०१५/प्र.क्र.३०६/पं.रा.४ बांधकाम भवन,२५,मर्झबान पथ, मुंबई तारीख ११ डिसेंबर,२०१५. व त्यातील सर्व मार्गदर्शक सुचना सभेसमोर वाचुन दाखवल्या व समजवून सांगीतल्या सदर परीपत्रकातील प्रस्तावनेत नमूद प्रमाणे अशा प्रकारचे नाहरकत दाखले देणे बाबत ग्राम पंचायत अधिनीयम अथवा त्या अनुशंगिक नियमांमध्ये तरतुद नाही तरी देखील परीपत्रकातील सुचने नुसार गावात ऊद्योग व्यवसाय वाढीस लागावे व त्या ऊद्योगांच्या माध्यमातून बेरोजगारांना रोजगाराचे संधी उपलब्ध व्हाव्यात म्हणून  गट नं. १०३ व्यवसाईक अकृषक परवानगी आणि भारत पेट्रोलियम कार्पोरेशन लि.चे रिटेल आऊटलेट चालु करणे साठी नाहरकत प्रमाणपत्र जारी करणे कामी ही सभा मान्यता देत आहे. सदरचे नाहरकत प्रमाणपत्र पुन्हा भविष्यात रद्द करता येणार नाही या प्रमुख अटिवर ग्राम पंचायतीचे ग्रामविकास अधिकारी यांच्या सहीने जारी करावे असे सर्वानमुते ठरले.

सुचक -------------------------------------

अनुमोदक ---------------------------------

ठराव सर्वानुमते मंजूर

अस्सल रजिष्टर वरुन संगणकीकृत नक्कल दिली असे

स्थळ :- ग्रा.पं.वाघोदे बु.ता.रावेर

दिनांक    /११/२०१७

# ग्राम पंचायत कार्यालय वाघोदे बु.

## तालुका रावेर जिल्हा जळगाव

दिनांक /११/२०१७

**नाहरकत प्रमाणपत्र**

प्रमाणित करणेत येते कि श्री.कुलदिप जगदीश पाटील व जगदीश देवराम पाटील दोघे रा.वाघोदे बु.ता.रावेर जि.जळगाव यांच्या मालकीच्या वाघोदा शिवारातील गट नं.१०३ क्षेत्र ००.८७ हेक्टर पो.ख.०.०१ पैकी पुर्वेकडील भाग ००.४० हेक्टर व्यवसाईक अकृषक करणे कामी ग्राम पंचायत मासिक सभा ठराव क्रमांक दिनांक /११/२०१७ नुसार खालील अटी व शर्तीचे आधिन राहून नाहरकत प्रमाणपत्र जारी करणेत येत आहे.

**अटी व शर्ती -**

१) सदर नाहरकत प्रमाणपत्र म्हणजे परवानगी अथवा बांधकाम परवानगी नव्हे.

२) सक्षम अधिकारी यांची घेणे कामी सदर नाहरकत प्रमाणपत्र महाराष्ट्र शासन ग्राम विकास विभाग शासन परीपत्रक क्रमांक व्हीपीएम२०१५/प्र.क्र.३०६/पं.रा.४ बांधकाम भवन,२५,मर्झबान पथ, मुंबई तारीख ११ डिसेंबर,२०१५. मधील सुचनांचे आधिन राहून जारी करणेत येत आहे.

३) सदर नाहरकत प्रमाणपत्र भविष्यात एकतर्फी रद्द करता येणार नाही.

४) बांधकामाचा आराखडा व अंदाजपत्रक सादर करुन बांधकाम परवानगी सक्षम अधिकारी यांचे कडून मिळवून घेणे बंधनकारक राहील.

स्थळ :- ग्रा.पं.वाघोदा ता.रावेर

दिनांक :- /१/२०१७

ग्राम विकास अधिकारी
ग्राम पंचायत वाघोदे बु.
ता.रावेर जि.जळगाव

# प्रोसिडींग बुक

आज दिनांक / /२०१ रोजी ग्राम पंचायत रोहीणी तालुका चाळीसगाव जि.जळगाव येथील मासिक सभा म.सरपंच यांचे अध्यक्षते खाली सकाळी ठिक वाजता ग्राम पंचायत कार्यालयात घेणेत आली त्यात खालील प्रमाणे ठराव पास करणेत आला.

**विषय क्रमांक** :- ग्राम पंचायत हद्दीत २६० मिटर ऑप्टीकल फायबर केबल टाकणे कामी नाहरकत दाखला देणे बाबत.

**ठराव क्रमांक** :- श्री.कुलदिप जगदीश पाटील व जगदीश देवराम पाटील दोघे रा.वाघोदे बु.ता.रावेर जि.जळगाव यांच्या मालकीच्या वाघोदे बु.शिवारातील गट क्रमांक १०३ क्षेत्र ००.८७ हेक्टर पो.ख.०.०१ पैकी पुर्वेकडील भाग ००.४० हेक्टर व्यवसाईक अकृषक करणे कामी चा श्री.कुलदिप जगदीश पाटील व जगदीश देवराम पाटील दोघे रा.वाघोदे बु.ता.रावेर जि.जळगाव यांचा दिनांक १०/११/२०१७ रोजीचा फक्त जगदिश देवराम पाटील यांची स्वाक्षरी असलेला अर्ज ग्राम पंचायत सचिव यांनी सभेसमोर वाचुन दाखवला तसेच समजवून सांगीतला तसेच महाराष्ट्र शासन ग्राम विकास विभाग शासन परीपत्रक क्रमांक व्हीपीएम२०१५/प्र.क्र.३०६/पं.रा.४ बांधकाम भवन,२५,मर्झबान पथ, मुंबई तारीख ११ डिसेंबर,२०१५. व त्यातील सर्व मार्गदर्शक सुचना सभेसमोर वाचुन दाखवल्या व समजवून सांगीतल्या सदर परीपत्रकातील प्रस्तावनेत नमूद प्रमाणे अशा प्रकारचे नाहरकत दाखले देणे बाबत ग्राम पंचायत अधिनीयम अथवा त्या अनुशंगिक नियमांमध्ये तरतुद नाही तरी देखील परीपत्रकातील सुचने नुसार गावात ऊद्योग व्यवसाय वाढीस लागावे व त्या ऊद्योगांच्या माध्यमातून बेरोजगारांना रोजगाराचे संधी उपलब्ध व्हाव्यात म्हणून गट नं. १०३ व्यवसाईक अकृषक परवानगी आणि भारत पेट्रोलियम कार्पोरेशन लि.चे रिटेल आऊटलेट चालु करणे साठी नाहरकत प्रमाणपत्र जारी करणे कामी ही सभा मान्यता देत आहे. सदरचे नाहरकत प्रमाणपत्र पुन्हा भविष्यात रद्द करता येणार नाही या प्रमुख अटिवर ग्राम पंचायतीचे ग्रामविकास अधिकारी यांच्या सहीने जारी करावे असे सर्वानमुते ठरले.

सुचक -------------------------------------

अनुमोदक ---------------------------------

ठराव सर्वानुमते मंजूर

अस्सल रजिष्टर वरुन संगणकीकृत नक्कल दिली असे

स्थळ :- ग्रा.पं.वाघोदे बु.ता.रावेर

दिनांक /११/२०१७

# ग्राम पंचायत कार्यालय रोहीणी

## तालुका चाळीसगाव जिल्हा जळगाव

दिनांक /११/२०१७

**नाहरकत प्रमाणपत्र**

प्रमाणित करणेत येते कि श्री.कुलदिप जगदीश पाटील व जगदीश देवराम पाटील दोघे रा.वाघोदे बु.ता.रावेर जि.जळगाव यांच्या मालकीच्या वाघोदा शिवारातील गट नं.१०३ क्षेत्र ००.८७ हेक्टर पो.ख.०.०१ पैकी पुर्वेकडील भाग ००.४० हेक्टर व्यवसाईक अकृषक करणे कामी ग्राम पंचायत मासिक सभा ठराव क्रमांक दिनांक /११/२०१७ नुसार खालील अटी व शर्तीचे आधिन राहून नाहरकत प्रमाणपत्र जारी करणेत येत आहे.

**अटी व शर्ती -**

५) सदर नाहरकत प्रमाणपत्र म्हणजे परवानगी अथवा बांधकाम परवानगी नव्हे.

६) सक्षम अधिकारी यांची घेणे कामी सदर नाहरकत प्रमाणपत्र महाराष्ट्र शासन ग्राम विकास विभाग शासन परीपत्रक क्रमांक व्हीपीएम२०१५/प्र.क्र.३०६/पं.रा.४ बांधकाम भवन,२५,मर्झबान पथ, मुंबई तारीख ११ डिसेंबर,२०१५. मधील सुचनांचे आधिन राहून जारी करणेत येत आहे.

७) सदर नाहरकत प्रमाणपत्र भविष्यात एकतर्फी रद्द करता येणार नाही.

८) बांधकामाचा आराखडा व अंदाजपत्रक सादर करुन बांधकाम परवानगी सक्षम अधिकारी यांचे कडून मिळवून घेणे बंधनकारक राहील.

स्थळ :- ग्रा.पं.वाघोदा ता.रावेर

दिनांक :- /११/२०१७

**ग्राम विकास अधिकारी**
**ग्राम पंचायत वाघोदे बु.**
**ता.रावेर जि.जळगाव**

# ग्राम पंचायत कार्यालय शिंदी

## तालुका भडगाव जिल्हा जळगाव

दिनांक २९/११/२०१७

प्रति,

म.सहाय्यक अधिक्षक
दिवाणी व फौजदारी न्यायालय
भडगाव जि.जळगाव

विषय :- फौजदारी किरकोळ अर्ज क्रमांक १४८ /२०१७ मध्ये
खुलासा दाखल करणे बाबत.

संदर्भ :- १) आपले कडील पत्र दि.२८/०९/२०१७ (प्राप्त दि.२८/११/२०१७)

महोदय,

उपरोक्त संदर्भीय विषयान्वये मे.कोर्टात समक्ष हजर राहून फौजदारी किरकोळ अर्ज क्रमांक १४८ /२०१७ मध्ये खुलासा दाखल करतो कि सन १९९१ चे मृत्यू नोंद रजिष्टर पंचायत समिती भडगाव येथे अभिलेख कक्षात जतन करणे कामी जमा करणेत आलेले आहे. सदरचा खुलासा सादर केला असे.

**ग्राम विकास अधिकारी**
**गृप ग्राम पंचायत शिंदी**
**ता.भडगाव जि.जळगाव**

# ग्राम पंचायत कार्यालय,लोहटार

## तालुका पाचोरा जिल्हा जळगाव

दि-नांज /१२/२०१७

**प्रति,**
म.गट विकास अधिकारी (ऊच्च श्रेणी)
पंचायत समिती,पाचोरा

**विषय** :- अतिक्रमण काढुन ताबा मिळणे बाबत.

**संदर्भ** :- १) आपले कडील पत्र क्र.जा.क्र.पंसपा/ग्रापं./वि.अ./आरआर/११७/२०१७
दिनांक २०/११/२०१७ (प्राप्त दि.२७/११/२०१७)

२) महाराष्ट्र ग्राम पंचायत अधिनीयम १९५८ चे कलम ५३ (१)

उपरोक्त संदर्भीय विषयान्वये विनंतीपुर्वक अहवाल सादर करतो कि,संदर्भिय पत्रान्वये मौजे लोहटार ता.पाचोरा येथील गट नं.२५४ मधील ०.३७ भिल्ल समाजाच्या स्मशानभुमीवरील अतिक्रमण काढुन पुराव्यानिशी सात दिवसाचे आत स्वयंस्पष्ट अहवाल सादर करण्याचे आदेशीत केलेले आहे.

परंतू महोदय, मी अतिशय विनम्रपणे आपल्या निदर्शनात आणुन देऊ इच्छीतो कि महाराष्ट्र ग्राम पंचायत अधिनीयम १९५८ चे कलम ५३ (१) चे अवलोकन केले असता ग्राम पंचायतीस गावाच्या गावठाण क्षेत्राच्या सिमेतील अतिक्रमण तसेच महाराष्ट्र ग्राम पंचायत अधिनीयम १९५८ चे कलम ५३ (२) अन्वये गायरान जमिनीवरील अनधिकृतपणे लागवड केलेली पिके जिल्हाधिकारी अथवा त्यांनी प्राधिकृत केलल्या कोणत्याही अधिका-याची परवानगी घेऊनच काढण्याचे अधिकार आहेत.

प्रस्तूत प्रकरणी स्मशानभुमीचे अधिकार अभिलेखाचे अवलोकन केले असता सदर जागा सरकार मालकीची असल्याचे दिसून येते. तरी महोदय, प्रस्तूत प्रकरणी अतिक्रमण काढणेची कार्यवाही करतांना अनियमीतता होऊ नये म्हणून महाराष्ट्र ग्राम पंचायत अधिनीयम १९५८ चे कलम १३९ अ नुसार योग्य ते मार्गदर्शन करुन पुढील योग्य ते आदेश होणेस विनंती.

# ग्राम पंचायत कार्यालय वडगाव बु.

## तालुका भडगाव जिल्हा जळगाव

जा.क्र. दिनांक /११/२०१७

**प्रति,**

श्री. ----------------------------------- रा.वडगाव बु. ता.भडगाव जि.जळगाव

विषय :- ग्राम पंचायत ऊता-यावर मालकाचे हक्कदार म्हणून नाव नोंद होणे बाबत.

संदर्भ :- १) आपला दिनांक चा अर्ज

उपरोक्त संदर्भीय विषयान्वये आपणास कळविणेत येते कि आपण अर्जात नमूद प्रमाणे गट नं.२/२ प्लॉट क्रमांक चीनोंद नमुना नं.८ वर करणे बाबत अर्ज केलेला आहे सदर अर्जानुसार आपल्या प्लॉटची नोंद नमुना नं.८ ला करणे कामी खालील प्रमाणे कागदपत्राची पुर्तता करुन अर्ज करावा

१) गाव नमुना नं.२ चा ऊतारा भुखंड क्रमांक १ ते ७६ (आपण अर्जासोबत जोडलेल्या कागदपत्रानुसार)
२) संपुर्ण गटाचा नकाशा भुखंड क्रमांक १ ते ७६ (आपण अर्जासोबत जोडलेल्या कागदपत्रानुसार)

वरील प्रमाणे कागदपत्राची पुर्तता करुन नकाशा प्रमाणे मोजणी करुन आपल्याला मिळालेल्या भुखंडाचा निश्चित स्वरुपात कब्जा दर्शवावा. तोपर्यंत आपला अर्ज यास्तरावरुन निकाली काढणेत येत आहे.

**ग्रामसेवक**
**ग्राम पंचायत वडगाव बु.**
**ता.भडगाव जि.जळगाव**

**प्रत -** म.गट विकास अधिकारी (ऊच्च श्रेणी) पंचायत समिती, भडगाव माहीती साठी सविनय सादर

**ग्रामसेवक**
**ग्राम पंचायत वडगाव बु.**
**ता.भडगाव जि.जळगाव**

## प्रोसिडींग बुक

आज दिनांक / /२०१ रोजी ग्राम पंचायत ------------- ता.---------- येथील मासिज म.सरंपच साहेब यांचे अध्यक्षते खाली सकाळी ठिक ०९.३० वाजता घेणेत आली त्यात खालील प्रमाणे ठराव पास करणेत आला.

**विषय क्र मांक** :- स्वच्छ भारत मिशन (ग्रामिण) अंतर्गत मंजूर बेसलाईन सर्वे यादीतील पात्र लाभार्थीचे शौचालय बांधकामाचा मक्ता श्री. ------------------------------------------------------ जि.जळगाव यांना देणे बाबत.

**ठराव क्रमांक** :- ग्राम पंचायत सचिव यांनी स्वच्छ भारत मिशन (ग्रामिण) अंतर्गत मंजूर बेसलाईन सर्वे यादीतील पात्र लाभार्थीचे शौचालय बांधकामाचा मक्ता मक्तेदार श्री. ---------------------------------------------------- जि.जळगाव यांना देणे बाबतचा दिनांक / /२०१ चा काम मिळणे बाबतचा अर्ज सभेसमोर वाचून दाखवला तसेच समजवून सांगीतला,यावर सर्व ग्रा.पं.सदस्यांमध्ये सविस्तर चर्चा घडुन आली असता श्री. -------------------------------------------------- जि.जळगाव हे आपल्या परीसरातील असून त्यांनी ठिकठिकाणी केलेल्या कामांची पाहणी ग्रा.पं.सभासदांनी केलेली आहे तसेच ग्रामस्थांना देखील त्याची कामे अवगत आहेत. त्यामुळे ते चांगले देर्जदार व टिकाऊ काम करतात अशी ग्रा.पं.सभासदांची व ग्रामस्थांची खात्री झालेली आहे.तसेच काम लवकरात लवकर चालू करुन पुर्ण करणे अत्यंत गरजेचे असलेने व गाव हागणदरी मुक्त करणे करीता विहीत मुदतीत शौचालयांची कामे पुर्ण करणे आवश्यक असलेने काम मुदतीत व दर्जेदार होणेचे दृष्टीने श्री. -------------------------------------------------- जि.जळगाव यांना कामाचा मक्ता देऊन काम पुर्ण करुन घ्यावे या सभेद्वारे मक्तेदार श्री. --------------------------------------------------- जि.जळगाव यांना स्वच्छभारत मिशन अंतर्गत मंजूर बेसलाईन सर्वेतील पात्र लाभार्थीचे शौचालय बांधकामाचा मक्ता देणेत यावा असे सर्वानुमते ठरले.

सुचक :- श्री.------------------------------
अनुमोदक :- श्री.--------------------------

ठराव सर्वानुमते मंजूर

अस्सल रजिष्टर वरुन नक्कल दिली असे.
स्थळ :- --------- ता.-----------
दिनांक :- / /२०१

## करारनामा

करारनामा निहून घेणार :- सरपंच ग्राम पंचायत -------------- ता.----------- जि.जळगाव

करारनामा लिहून देणार :- ---------------------------------------------------------

कारणे करारनामा लिहून देतो कि, ग्राम पंचायत ता. ----------- जि.जळगाव येथे स्वच्छ भारत मिशन अंतर्गत ---------- ता.-------- गावातील गावातील बेसलाईन सर्वेच्या यादीतील पात्र लाभार्थ्यांचे शौचालय बांधकाम करणे आहे सदरचे काम नियमा प्रमाणे खालील अटी व शर्तीचे आधिन राहून दिले व घेतले असे.

**अटी व शर्ती**

१) काम मुदतीत पुर्ण करणे आवश्यक आहे
२) काम अखंड रित्या करावे काम अपुर्ण आवस्थेत ठेऊ नये
३) कामासाठी अग्रीम दिला जाणार नाही
४) मक्तेदार यांनी पाण्याची स्वतः व्यवस्था करावी .ग्रा.पं.पाण्याची व्यवस्था करुन देणार नाही.
५) गावातील कोणत्याही ग्रामस्थास अथवा सभासदास कामाचा दर्जा निकृष्ट दर्जाचा वाटल्यास काम त्वरीत थांबवणेत येईल.

स्थळ :- --------- ता.----------
दिनांक :- / /२०१

लिहून घेणार

लिहून देणार

-----------------------------------------------------
ता.------------ जि.जळगाव

श्री.-----------------------------------
-------------------------------------
दिनांक / /२०१

प्रति,

सरपंच /ग्राम विकास अधिकारी
ग्राम पंचायत -------- ता.------------

विषय :- स्वच्छ भारत मिशन अंतर्गत शौचालय बांधकामाचा मक्ता मिळणे बाबत.

अर्जदार :- ----------------------------------------------------------------

जि.जळगाव

महोदय,

वरील विषयान्वये विनंती अर्ज करतो की, मी बांधकाम क्षेत्रातील अनुभवी मक्तेदार असून मी या पुर्वी बरीच कामे या परीसरात व तालुक्यात उत्कृष्टरित्या मुदतीत पुर्ण केलेली आहेत. आता पर्यंत मी कोणतेही काम अपुर्ण अवस्थेत ठेवलेले नाही तसेच मी शासकीय करारनाम्यरनुसार अटी शर्तीस आधिन राहून काम पुर्ण करुन देईल  तरी महोदय, मला सदर स्वच्छ भारत मिशन अंतर्गत शौचालय  बांधकामाचा मक्ता मिळावा ही नम्र विनंती.

आपला विश्वासू

# प्रोसिडींग बुक

आज दिनांक २३/११/२०१७ रोजी सकाळी ठिक ०९.०० वाजता ग्राम पंचायतीचाी मासिक सभा म.सरपंच साो यांचे अध्यक्षते खाली ग्रा.पं.सभागृहात बोलाविण्यात आली त्यात खालील प्रमाणे ठराव पास करणेत आला.

**विषय क्रमांक** १४ वा वित्त आयोग अंतर्गत १० टक्के महीला व बाल कल्याण निधीतून अंगणवाडी साहीत्य खरेदी करणे बाबत.

**ठराव क्रमांक** १४ वा वित्त आयोग अंतर्गत १० टक्के महीला व बाल कल्याण अंतर्गत अंगणवाडी साहीत्य खरेदी करणे बाबत ग्राम पंचायत सदस्या मध्ये सविस्तर चर्चा घडुन आली तरी सन २०१६/१७ च्या कृती आराखडयात सदर कामाचा समावेश असून सदर कृती आराखडा तालुका स्तरीय छाननी समिती कडून मंजूर झालेला असून ग्राम पंचायतीस खुल्या बाजारातील चढाओढीचा फायदा व्हावा म्हणून सदरचे साहीत्य खरेदी करणे कामी महाराष्ट्र ग्राम पंचायत लेखा संहीता २०११ चे कलम ४५ नुसार खुल्या बाजारातून निवीदा मागवून सदरचे साहीत्य खरेदी करणेत यावे असे सर्वानुमते ठरले.

यावर ग्राम पंचायत सचिव यांनी सभेच्या निदर्शनात आणुन दिले कि **"महाराष्ट्र शासन ग्राम विकास विभाग शासन निर्णय क्रमांक निवीदा २०१४/प्र.क्र.२६०/पं.रा.-७/बांधकाम भवन ,२५,मर्झबान पथ फोर्ट मुंबई ४००००१ तारीख २७ मे २०१५ व त्यातील संदर्भाधिन सर्व परीपत्रके व शासन निर्णयातील तरतूदी सभेसमोर वाचुन दाखविल्या व समजावुन सांगीतल्या त्यानुसार सदर साहीत्याची खरेदी ही ई-निवीदा मागवून साहीत्य खरेदी करावी "** यावर उपस्थित सर्व ग्राम पंचायत सभासद, सरपंच उपसरपंच यांनी सांगीतले कि, ग्राम पंचायतीचा कारभार महाराष्ट्र ग्राम पंचायत अधिनीयम १९५८ व महाराष्ट्र ग्राम पंचायत लेखा संहीता २०११ मधील तदतुदी नुसार चालत असतो व उक्त अधिनीयम व संहितेचे अवलोकन केले असता त्यात ई-टेंडरींग करुन साहित्य खरेदी करावे अशी तरतुद आढळून आली नाही म्हणून खुल्या बाजारातून निवीदा (कोटेशन) मागवून तुलनात्मक तक्ता सरपंच यांनी मंजूर करावा व खुल्या बाजारातील चढाओढीचा ग्राम पंचायतीला लाभ होईल म्हणून सदर साहीत्य खुल्या बाजारातून निवीदा (कोटेशन) मागवून ऊत्तम दर्जाचे साहीत्य **महाराष्ट्र ग्राम पंचायत लेखासंहीता २०११ चे कलम ४५** नुसार स्थानिक पुरवठादार यांचे कडुन (खुल्या बाजारातून) निवाीदा (कोटेशन) मागवून तुलनात्मक तक्ता मंजूर करुन साहीत्य खरेदी करण्यात यावी व काम ग्राम पंचायतीने एजन्सी म्हणून काम करावे असे सर्वानुमते ठरले.

सुचक :- ---------------------------

अनुमोदक :- ------------------------

ठराव सर्वानुमते मंजूर
अस्सल रजिष्टर वरुन संगणकीकृत नक्कल दिली असे
स्थळ :- गोंदेगाव ता.सोयगाव
दिनांक :- /११/२०१७